
बुधवार, १५ फेब्रुवारी २०२३

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २०८
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## कॉपीमुक्त अभियान : परीक्षा काळात विशेष दक्षता



**मुंबई :** राज्यातील दहावी आणि बारावीच्या परीक्षा येत्या काही दिवसांत होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर परीक्षा केंद्रावर होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी राज्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी यांनी या संदर्भात मंगळवारी (दि. १४) राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादरीकरणही केले. कॉपीमुक्त अभियानांतर्गत संवेदनशील समजल्या जाणाऱ्या परीक्षा केंद्रांवर चित्रीकरण करण्यात येणार आहे. परीक्षा काळात झेरॉक्स सेंटरवर विद्यार्थ्यांचा घोळका असतो. तेथून मिनी कॉपी पुरवल्या जातात. असे प्रकार रोखण्याकरिता परीक्षा केंद्राजवळील ५० मीटरपर्यंतच्या परिसरात झेरॉक्स सेंटर बंद ठेवण्यात येतील. परीक्षा केंद्राच्या बाहेर कॉपी पुरविणाऱ्यांचा घोळका असेल तर त्यावर नियंत्रण आणण्यासाठी पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. परिणामी १४४ कलमसुद्धा लागू करण्याची शक्यता आहे.


### अंतरंग

विधवा महिलेवर अत्याचार; आरोपीस सक्तमजुरीची शिक्षा/२

एसटी कर्मचाऱ्याशी वाद घालून पोलीस शिपायावर हल्ला/५

करंजाडेत सरपंच, उपसरपंच चषक क्रिकेट स्पर्धा/८


# महाराष्ट्रातही आता पीएम श्री योजना

## मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय; ८४६ शाळांचा होणार सर्वांगीण विकास

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील ८४६ शाळांचा सर्वांगीण विकास करणाऱ्या पीएम श्री योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय मंगळवारी (दि. १४) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. देशभरात पहिल्या टप्प्यात १५ हजारांहून अधिक शाळा उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सर्वोत्कृष्ट शाळा म्हणून विकसित करण्यात येणार असून यात राज्यातील ८४६ शाळांचा समावेश करण्यात येणार आहे.



पीएम श्री योजनेत सहभागी होण्यासाठी राज्य शासनाने केंद्रासमवेत सामंजस्य करार केला आहे. या करारानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्यात लागू करण्यात येईल. पीएम श्री योजनेत केंद्राचा ६० टक्के हिस्सा असेल. प्रत्येक शाळेसाठी एक कोटी ८८ लाख एवढी तरतूद पाच वर्षांसाठी करण्यात येईल. या योजनेतील दुसऱ्या टप्प्यात ४०८ गट, २८ महानगरपालिका आणि ३८३ नगरपालिका व नगर परिषदा यामधून पीएम श्री शाळांची निवड केली जाईल.

या शाळांमध्ये माजी विद्यार्थ्यांनादेखील सहभागी करून घेऊन विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन व शैक्षणिक मदत करण्यात येईल. काही कारणांमुळे विद्यार्थ्यांची शाळेतून गळती झाल्यास त्यांना पुन्हा प्रवेश देऊन अशा मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यात येणार आहे.

### अशी असेल कार्यपद्धती

*या शाळांचा विकास प्रामुख्याने पुढील सहा प्रमुख आधारस्तंभांवर केला जाईल. यामध्ये अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र व मूल्यमापन; प्रवेश आणि पायाभूत सुविधा; मानव संसाधन आणि शालेय नेतृत्व; समावेशक पद्धती आणि लाभार्थी समाधान; व्यवस्थापन, देखरेख आणि प्रशासन; लाभार्थी समाधान यांचा समावेश आहे. या योजनेची अंमलबजावणी राज्य स्तरावरून शालेय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समिती, जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती आणि महापालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समित्यांमार्फत केली जाईल. राज्य प्रकल्प संचालक हे राज्य अंमलबजावणी समितीचे अध्यक्ष असतील.*

# सर्व क्षेत्रांच्या समृद्धीसाठी विकासाच्या रोडमॅपद्वारे कामे

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्व क्षेत्रांच्या आणि समाजाच्या समृद्धीसाठी विकासाचा रोडमॅप तयार करण्यात आला असून त्याद्वारेच राज्यातील विविध विकासकामे वेगाने प्रगतिपथावर असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.





दादर येथे टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीच्या वतीने ‘महाराष्ट्राचा महासंकल्प’ या विषयावरील राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या वेळी टीव्ही ९चे व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी बरूण दास, संपादक उमेश कुमावत उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे. १५ टक्के जीडीपी महाराष्ट्र तयार करतो. २० टक्क्यांपेक्षा जास्त निर्यात महाराष्ट्रातून होते. ३८ टक्के थेट विदेशी गुंतवणूक (एफडीआय) महाराष्ट्रात येते. देशाला पाच ट्रिलियन इकॉनॉमीपर्यंत पोहचविण्याचे उद्दिष्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आहे. त्यासाठी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आपल्याला वन ट्रिलियनची करावी लागेल. त्या दृष्टीने वाटचाल करीत आहोत. तंत्रज्ञानात सुधारणा करण्यात येत आहेत. यातून वेगवान विकास घडत आहे.

### रोजगार निर्मितीला दिली जातेय चालना

*महाराष्ट्र हे स्टार्टअप आणि इनोव्हेशनचे कॅपिटल आहे. देशातील ८० हजार स्टार्टअप्सपैकी पंधरा हजार स्टार्टअप्स महाराष्ट्रात आहेत. देशातील शंभर युनिकॉर्नपैकी २५ युनिकॉर्न महाराष्ट्रात आहेत. इनोव्हेशनच्या माध्यमातून इकोसिस्टीम तयार करून रोजगार निर्मितीला चालना देण्यात येत आहे. डेटा सेंटरमध्ये महाराष्ट्राची क्षमता देशात ६० टक्के झाली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.*

पायाभूत सुविधांचा विकास हा विकासाचा मूलमंत्र आहे हे जाणून पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर देण्यात येत आहे. सेवा, उद्योग आणि कृषी क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्यात येत आहे. समृद्धी महामार्ग एक इकॉनॉमिक कॉरिडॉर आहे. याद्वारे १४ जिल्हे थेट जेएनपीए बंदराशी जोडले जात आहेत. पाच हजार किमीचे ॲक्सेस कंट्रोल हायवे तयार करण्यात येत आहेत. समृद्धी महामार्ग गडचिरोलीपर्यंत नेण्यात येत आहे. २५ हजार कोटी रुपयांपर्यंतची गुंतवणूक तेथे येत आहे. नागपूर-गोवा हायवेमुळे मराठवाड्यातील पाच जिल्हे इकॉनॉमिक कॉरिडॉरचा भाग होतील. यामुळे शेती व उद्योगालाही चालना मिळेल. विरार-अलिबाग कॉरिडॉर तयार करण्यात येत आहे. पहिली इंटिग्रेटेड स्मार्ट सिटी ‘ऑरिक सिटी’ आकारास येत आहे. एक लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. (पान २ वर..)

# हायपरबेरीक ऑक्सिजन थेरपी सेंटरचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. मनोज गुप्ता यांनी खारघर सेक्टर १२ येथे ‘प्राण’ हे हायपरबेरीक ऑक्सिजन थेरपी सेंटर सुरू केले आहे. या सेंटरचे उद्घाटन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १३) झाले.





(छाया : रमेश पाटील)

हायपरबेरीक ऑक्सिजन थेरपी या उपचार पद्धतीत दाब हा साधारणतः नेहमीपेक्षा दुप्पट केला जातो. त्यामुळे रुग्ण १०० टक्के ऑक्सिजन श्वास घेतो. या वाढलेल्या दाबामुळे ऑक्सिजन हा प्लाझमामध्ये अधिक प्रमाणात विरघळतो. त्यामुळे दीर्घकाळ आणि अधिक समस्यांनी युक्त अशा जखमाही भरून येतात. यापूर्वी ही थेरपी मुंबईमध्ये उपलब्ध होती.

उद्घाटन समारंभास माजी नगरसेवक प्रवीण पाटील, शत्रुघ्न काकडे, भाजप खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, अमर उपाध्याय, कीर्ती नवघरे, प्रकाश भगत, कळंबोली पोलीस निरीक्षक संदीप शिंदे, खारघर पोलीस निरीक्षक संजय पाटील, डॉ. एस. एम. पाटील, गुरुनाथ गायकर, गीता चौधरी, विनोद ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी डॉ. मनोज गुप्ता यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या हायपरबेरीक ऑक्सिजन थेरपीची माहिती सर्वांपर्यंत पोहचवण्याचे आवाहन केले.

## सत्तासंघर्षावर आज पुन्हा सुनावणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राज्यातील सत्तासंघर्षावर मंगळवारी (दि. १४) सुनावणी झाली. त्यामध्ये ठाकरे गटाच्या वतीने युक्तिवाद करण्यात आला. आता यावर बुधवारी (दि. १५) शिंदे गटाच्या वतीने युक्तिवाद करण्यात येणार आहे.

अविश्वास प्रस्ताव प्रलंबित असताना पीठासन अध्यक्षांना कारवाईचा अधिकार नाही या अरुणाचल प्रदेशातील निकालाचा आधार घेत उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांना आमदारांच्या अपात्रतेबाबत कारवाईचा अधिकार नाही, असा दावा शिंदे गटाकडून करण्यात येत आहे.

## निवडक

### ‘बीबीसी’च्या कार्यालयांमध्ये आयकर विभागाची धडक

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय माध्यमसंस्था बीबीसीच्या मुंबई व दिल्ली कार्यालयात मंगळवारी (दि. १४) आयकर विभागाची पथके धडकली. आयकर नियमांचे उल्लंघन झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर विभागाने हे सर्वेक्षण सुरू केल्याची माहिती आहे. या वेळी बीबीसीच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे फोन जप्त करण्यात आले होते. आयकर विभागाने ही कारवाई प्राथमिक स्तरावरील असल्याचे म्हटले आहे.

### अभिनेते जावेद खान अमरोही यांचे निधन

**मुंबई :** अभिनेते जावेद खान अमरोही यांचे मंगळवारी (दि. १४) निधन झाले. त्यांनी जवळपास १५० चित्रपटांमध्ये काम केले. लगान आणि चक दे इंडिया या चित्रपटांमुळे जावेद यांना विशेष लोकप्रिता मिळाली. त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे.





**पनवेल :** उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील आयथिंक स्पोर्ट्स क्लबचा क्रिकेटपटू धैर्य किशोर पाटील याने मुंबई क्रिकेट असोसिएशन आयोजित भास्कर ट्रॉफी स्पर्धेत नाबाद द्विशतकी खेळी केली. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी धैर्यचे अभिनंदन व कौतुक केले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, किशोर पाटील, भाऊ भोईर, पी. के. ठाकूर, मनोहर भगत उपस्थित होते.

## नवी मुंबईतील पाळणाघरामध्ये बाळाला मारहाण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील पाळणाघरात एका बाळाला मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

सीसीटीव्ही फुटेजनुसार वाशीतील स्मार्ट थॉट्स डे केअर सेंटरमध्ये १६ महिन्यांचा चिमुकला खुर्चीवर बसला आहे. त्या वेळी टेबलावर त्याच्यासाठी जेवणाचे ताट ठेवले जाते. बाळ त्या ताटातील चमचा घेण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा तेथील आयाने त्याच्या थोबाडीत मारले आणि खुर्चीवरून उचलून बाजूला ठेवले. घरी आल्यावरदेखील बाळाचे रडणे थांबत नसल्याने पालकांना संशय आला. सीसीटीव्ही फुटेज पाहिल्यानंतर हा प्रकार समोर आला.

# पुण्यामध्ये महाविकास आघाडीत नाराजीनाट्य

## काँग्रेसच्या पोस्टरवरून राष्ट्रवादीचे नेते गायब

**पुणे : प्रतिनिधी**


पुणे शहरातील कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारसभांदरम्यान लावलेल्या बॅनरवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांचे फोटो दिसत नाहीत. त्यामुळे महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची चिन्हे आहेत.

पिंपरी चिंचवडमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे, भाजप उमेदवार अश्विनी जगताप आणि अपक्ष उमेदवार राहुल कलाटे अशी तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे, तर पुणे शहरातील कसबा पेठ मतदारसंघात भाजप उमेदवार हेमंत रासने आणि काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्यात थेट लढत होत आहे.

काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचार सभेत लावलेल्या बॅनर्सवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकही नेत्याचे फोटो नाहीत. यामुळे कसबयात महाविकास आघाडीमध्ये नाराजीनाट्य सुरू झाले आहे. याबद्दल राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

काँग्रेसच्या प्रचार सभेमध्ये लावण्यात आलेल्या बॅनरवर अशोक चव्हाण, नीलम गोऱ्हे, विश्वजित कदम, राजेंद्र गवई यांचे फोटो आहेत तसेच काँग्रेस व शिवसेना उद्धव ठाकरे गटातील नेत्यांची नावे आहेत, मात्र कुठेही राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचे नाव किंवा फोटो नाही. यामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे सूर दिसून येत आहेत.

# ग्रामीण भागात पोपटी पार्ट्यांची धूम





**पनवेल : वार्ताहर**

दरवर्षीप्रमाणे यंदाही पनवेल परिसरातील ग्रामीण भागात पोपटी पार्ट्यांची धूम शेतासह फार्महाऊसवर सुरू झाली आहे. त्यामुळे गावठी वालांसह इतर साहित्याची बाजारपेठेत मागणी वाढली आहे.

गेल्या काही दिवसांपासून पनवेल परिसरात असलेल्या ग्रामीण भागासह शेतात आणि फॉर्महाऊसमध्ये वैशिष्ट्यपूर्ण व लज्जतदार पोपटीचा घमघमाट सुटला आहे. जिथे तिथे पोपटीचीच चर्चा व तयारी पहावयास मिळत आहे. त्यामुळे गावठी वालाच्या शेंगांना वाढती मागणी आहे. वालाच्या शेंगा या भांबुर्डीच्या पाल्यासह मडक्यामध्ये मोकळ्या आगीवर विशिष्ट पद्धतीने शिजविल्या जातात. त्यामध्ये कांदा व बटाटा तसेच अंडी, चिकन घालून लज्जत वाढविली जाते. यालाच पोपटी असे म्हणतात. ती चविष्ट असते.

सध्या पनवेल तालुक्यात सर्वत्र पोपटी पार्ट्यांची धम्माल सुरू आहे. चवदार व टपोऱ्या दाण्याच्या वालाच्या शेंगांच्या पोपटीला अधिक पसंती आहे. सुरुवातीला गावठी शेंगा तयार झाल्या नसल्याने परजिल्ह्यातून आलेल्या शेंगांवरच खवय्यांना समाधान मानावे लागत होते, परंतु आता स्थानिक शेंगा तयार झाल्या असून किती खाल्या तरी त्या पोटाला बाधत नाहीत. त्यामुळे सध्या ठिकठिकाणी शेतावर किंवा घराबाहेर मोकळ्या जागेत पोपटी पार्ट्यांची मेजवानी पहायला मिळते. येथे काही ठिकाणी काव्यसंमेलने रंगतात, तर गप्पा-गोष्टींच्या मैफिलीमध्ये सुखदुःखाची देवाणघेवाण होते. अशा वेळी पोपटी लावल्यावर रंगत वाढते. दरम्यान, अनेक वेळा मडकी उपलब्ध नसल्यामुळे पत्र्याच्या डब्यातही पोपटी बनत असून त्यालाही खवय्ये पसंती देत आहेत.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळावा

**अलिबाग : प्रतिनिधी**



जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड अलिबाग कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील नामांकित आस्थापनांकडील रिक्त पदांच्या भरतीसाठी गुरुवारी (दि. १६) ऑनलाईन रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

दहावी, बारावी उत्तीर्ण, आयटीआय, डिप्लोमा, पदवी इत्यादी पात्रताधारक नोकरी करण्यास इच्छुक उमेदवारांनी www.mahaswyam.gov.in संकेतस्थळावर जॉब सीकर या टॅबवर जाऊन आपला युझर आयडी व पासवर्ड वापरून लॉग इन करावे तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा या टॅबवर क्लिक करून आपला जिल्हा निवडून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध असलेल्या पदासाठी नोंदणी करावी.

रोजगार मेळाव्यातील रिक्त पदांची माहिती वेबपोर्टलवर उपलब्ध आहे. जास्तीत जास्त बेरोजगार युवकांनी या ऑनलाईन रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त अमिता पवार यांनी केले आहे.

# शिवजयंतीसाठी बाजारपेठा सजल्या

**पनवेल : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक तथा महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती जवळ येत आल्याने बाजारपेठांमध्ये भगवे ध्वज, टी-शर्ट, कुर्ते, पट्टे, शिवरायांचे फोटो आणि पुतळे यांनी दुकाने सजलेली दिसत आहेत. सगळीकडे उत्साहाचे वातावरण दिसत आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेताच मराठी तरुणांमध्ये उत्साह सळसळतो. शिवजयंती येत्या रविवारी म्हणजे १९ फेब्रुवारीला असल्याने ती कशी साजरी करायची, त्यासाठी शिवज्योत कोणत्या किल्ल्यावरून आणायची याची चर्चा सुरू झाली आहे. शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर पनवेलची बाजारपेठही सजली आहे. शहरातील दुकानांमध्ये भगवे ध्वज, भगवे टी-शर्ट, भगवे कुर्ते मोठ्या प्रमाणात विक्रीला आहेत.

मोहम्मद सईद यांच्या फर्स्ट चॉइस दुकानातील दिलीप रॉय यांनी सांगितले की, १०० रुपयांपासून ३०० रुपयांपर्यंत किंमत असलेले कमीत कमी ५०० ध्वज, एक हजार कुर्ते व ३०० पट्टे या चार दिवसांत विकले जातात. यामध्ये आम्हाला जास्त नफा मिळत नाही, पण त्यामुळे आमचे नाव होते. म्हणून आम्ही या काळात त्याची विक्री करीत असतो.

दरम्यान, पनवेलमधून जाणाऱ्या महामार्गावर राजस्थानहून आलेली अनेक कुटुंब छत्रपती शिवाजी महाराजांचे विविध प्रकारचे व आकारातील पुतळ्यांची विक्री करतात. यामध्ये सिंहासनावर बसलेले, अर्धपुतळा व अश्वारूढ असलेल्या महाराजांचे पुतळे विक्रीला मांडलेले दिसत आहेत. याच्या किमती १०० रुपयांपासून १५०० रुपयांपर्यंत आहेत. राजस्थानी कुटुंब अनेक वर्षे शिवजयंतीच्या काळात हे पुतळे विक्रीसाठी घेऊन येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

# 'एमईएससी'ची स्थापना क्रांतिकारक पाऊल

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आर्थिक सल्लागार परिषदेच्या बैठकीत प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेऊन राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी स्थापन करण्यात आलेली आर्थिक सल्लागार परिषद ही महाराष्ट्राच्या दृष्टीने क्रांतीकारक पाऊल असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेची पहिली बैठक झाली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बैठकीबाबत माहिती देताना मुख्यमंत्री बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, टाटा सन्सचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन उपस्थित होते

ही बैठक महाराष्ट्राला सर्वांगीण विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे सांगत मुख्यमंत्री



पुढे म्हणाले, महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताची अर्थव्यवस्था २०२७पर्यंत पाच लाख कोटी डॉलर्सपर्यंत विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी महाराष्ट्राची भूमिका निर्णायक आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असणारे राज्य असून महाराष्ट्राच्या सहभागाने पाच लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यास मोठी मदत होणार आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर ही परिषद महत्त्वपूर्ण आहे.

आर्थिक विकासाबरोबरच, शेती, शेतकरी त्यातील प्रत्येकाच्या राहणीमानाचा विचार ही परिषद करणार आहे. सामान्य माणूस हाच विकासाच्या प्रक्रियेत केंद्रस्थानी असणार आहे. शेती क्षेत्रातील उत्पादन वाढ, तंत्रज्ञानाचा वापर, वित्तपुरवठा याबाबत परिषद अभ्यास करून सूचना, शिफारशी करणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

राज्यातील संधींना गतीमानता प्रदान करण्यासाठी परिषदेतील सदस्य आपले योगदान देण्यास उत्सुक असून आर्थिक विकासाच्या विविध कल्पना या परिषदेच्या माध्यमातून मांडण्यात आल्या असल्याची माहिती परिषदेचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी दिली. राज्याच्या आर्थिक विकासासह प्रत्येकाचे जीवनमान उंचावण्यासाठी, दरडोई उत्पन्न वाढावे यासाठी, चर्चा करण्यात आली. यासोबतच कृषी, कृत्रिम बुद्धीमत्ता, हरित मार्ग यांसारख्या अनेक विषयांवर चर्चा झाली.

# चेंढरे बायपास येथे दुकानांना आग

**अलिबाग : प्रतिनिधी**

चेंढरे बायपासजवळील पीएनपी नाट्यगृहासमोरील दोन दुकानांना मंगळवारी (दि. १४) सकाळी आग लागली. या आगीत स्पेअर पार्ट्सचे दुकान भस्मसात झाले. शेजारच्या दुकानाचे नुकसान झाले. एक कारदेखील जळाली. सुदैवाने जीवितहानी टळली. अलिबाग नगर परिषद व थळ येथील आरसीएफ कंपनीच्या अग्निशमन दलाच्या मदतीने ही आग विझवली.

चेंढरे बायपास येथे पीएनपी नाट्यगृहासमोर साई सर्व्हिस ऑटो मोबाईल दुकान आहे, तसेच बाजूला दिनेश ऑटो पार्टचे दुकान आहे. मंगळवारी सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास दुकानांना आग लागली. अग्निशमन दलाने तीन तासांत आग आटोक्यात आणली. आगीमध्ये सामान जळून खाक झाले असून दुकानांच्या बाजूला असलेली एक कारदेखील जळाली आहे. आगीत एक कोटींचे नुकसान झाले.

# धान उत्पादकांना प्रती हेक्टरी १५ हजार प्रोत्साहनपर रक्कम

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील धान उत्पादकांना प्रती हेक्टरी १५ हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्यासाठी एक हजार कोटी रुपये इतक्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्याचा निर्णय मंगळवारी (दि. १४) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. याचा लाभ अंदाजे पाच लाख शेतकऱ्यांना होणार आहे.

या संदर्भात नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनातदेखील मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती. २०२२-२३ या खरीप पणन हंगामात केंद्र शासनाने मंजूर केलेल्या हमी भावाव्यतिरिक्त नोंदणीकृत शेतकऱ्यांना धान लागवडीखालील जमिनीनुसार प्रती हेक्टरी १५ हजार रुपये या प्रमाणे प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येईल. ही रक्कम दोन हेक्टर मर्यादेत देण्यात येईल.

मागील म्हणजे २०२१-२२ खरीप हंगामात एक कोटी ३३ लाख ७९ हजार ८९२ क्विंटल धान खरेदी झाली होती, पण या हंगामात धानाकरिता प्रोत्साहनपर रक्कम जाहीर करण्यात आली नव्हती. या पूर्वीच्या खरीप हंगामामध्ये धान उत्पादकांना प्रती क्विंटल ७०० रुपये अशी रक्कम प्रोत्साहनपर म्हणून देण्यात आली आहे, मात्र ही रक्कम प्रती क्विंटल देण्यात येत असल्यामुळे काही अडचणी येत होत्या. ज्या शेतकऱ्यांकडे ५० क्विंटलपेक्षा कमी धान उत्पादन आहे अशांच्या नावे ५० क्विंटल मर्यादेपर्यंत जास्तीची धान खरेदी करण्याचे प्रसंग घडले तसेच शेजारील राज्याचे धान महाराष्ट्रात विक्रीकरिता आणल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या.

# रायगड जिल्हा होणार कॉपीमुक्त; प्रशासनाची सज्जता

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

इयत्ता १२ वीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २१ मार्च तसेच इयत्ता १० वीची २ ते २५ मार्च या कालावधीत होणार आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, स्वावलंबन व अभ्यासू वृत्ती जागृत व्हावी, योग्य सवयीचा अंगीकार योग्य टप्प्यावर होणे आवश्यक आहे. त्यानुसार परीक्षेचे उद्दिष्ट सफल व्हावे, यासाठी प्रशासनाने हे कॉपीमुक्त अभियान सफल करण्याचा संकल्प केला आहे. या अभियानामध्ये पालकांसह विद्यार्थ्यांनीही सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून पालकांना करण्यात आले आहे.

जिल्ह्यात एकूण १५ परिरक्षण केंद्र असून उच्च माध्यमिक परीक्षा केंद्र ४६, माध्यमिक परीक्षा केंद्र ७४ अशी आहे, तसेच इयत्ता १२ वीच्या परीक्षेला बसणारे विद्यार्थी एकूण संख्या ३१ हजार २७२ तर इयत्ता १० वी परीक्षेला बसणारे विद्यार्थी एकूण ३५ हजार ७३३ इतकी आहे. प्रत्येक



तालुक्यासाठी तालुकास्तरावर एक पथक नियुक्त करण्यात आले आहे. एकूण पाच भरारी पथके तयार करण्यात आली आहे. कॉपीमुक्त परीक्षा अभियानाच्या जनजागृतीसाठी मुख्याध्यापक, शिक्षक, शैक्षणिक संस्थांच्या प्रमुखांची कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा दक्षता समिती गठित केली आहे. ही समिती थेट शाळा आणि पालकांशी संवाद साधणार आहेत.

प्रत्येक परीक्षा केंद्राच्या ५० मीटरच्या आत अनधिकृत व्यक्तींना प्रवेश नसेल, फौजदारी प्रक्रिया संहिता १९०३च्या कलम १४४ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश देण्यात आले आहेत. १०० टक्के विद्यार्थ्यांचे परीक्षा केंद्र प्रवेशावेळी शाळेतील कर्मचारीमार्फत झडती होणार असून प्रत्येक परीक्षा केंद्रावर मुलांच्या कॉपी तपासणीसाठी अंगणवाडी सेविका, मदतनीस साळेच्या महिला कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रावर व्हिडीओ रेकॉर्डींग करण्याच्या केंद्रसंचालकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

महसूल विभागाची बैठी पथके स्थापन करण्यात येणार असून परीक्षा केंद्रावर परीक्षेआधी एक तास व परीक्षेनंतर एक तास बैठे पथक असेल. वरिष्ठ महसूल कर्मचाऱ्यांची परीक्षा केंद्रावर नियुक्ती करण्यात येईल. कोणी कॉपी करताना आढळल्यास त्या विद्यार्थ्यावर कठोर कारवाई केली जाईल. तोतया विद्यार्थी परीक्षेस बसविल्यास संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करून पुढील पाच परीक्षांना प्रतिबंध करण्यात येईल व फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. सर्व पालकांनी कॉपीमुक्त अभियानाबाबतची नोंद घेऊन आपल्या मुलांना समुपदेशन करावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर एक तास आधी पोहचणे आवश्यक आहे.

# विधवा महिलेस लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**माणगाव, पोलादपूर : प्रतिनिधी**

**आरोपीस १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा**

महाड एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीत राहणाऱ्या एका विधवा महिलेस आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून सुमारे दीड वर्ष तिच्यावर अत्याचार केल्याने आरोपीला १० वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा माणगाव सत्र न्यायालयाने सुनावली आहे.

ही घटना २०१६ पूर्वी घडली आहे. फिर्यादी पीडित महिलोला आरोपी संजय राजाराम कदम याने लग्नाचे अमिष दाखवून तिच्यावर दीड वर्षापासून अत्याचार केले. त्यातून फिर्यादींनी मुलास जन्म दिला होता. याबाबत फिर्यादींनी आरोपीला सांगितले असता, त्यांनी लग्न करण्यास नकार देऊन याबाबत कोणाला सांगितलेस तर ठार मारण्याची धमकी दिली. त्यानंतर पीडित महिलेने महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दोषारोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय माणगाव येथे दाखल केले. पीडित महिलेची साक्ष व डीएनएचा अहवाल महत्त्वाचा ठरला. खटल्यामध्ये अतिरिक्त शासकिय अभियोक्ता जितेंद्र डी. म्हात्रे यांनी सरकारी पक्षाच्या वतीने काम पाहिले व कोर्टासमोर प्रभावीपणे युक्तिवाद करून न्यायनिर्णय दाखल केले. सुनावणीदरम्यान पैरवी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक यु. एल. धुमास्कर, महिला हवालदार छाया कोपनर, हवालदार शशिकांत कासार व शशिकांत गोविलकर, सोमनाथ ढाकणे यांनी सहकार्य केले. विशेष व सत्र न्यायाधीश हर्षल भालेराव यांनी मंगळवारी (दि. १४) गुन्ह्याच्या शाबीतीनंतर आरोपी संजय राजाराम कदम यांस दोषी ठरवून भादंविसं कलम ३७६ (२) (एन) अन्वये १० वर्षे सक्त मजुरी ६०,००० रु. दंड, भा.द.वि. क. ५०६ अन्वये दोन वर्ष सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली.

# जिल्हास्तरीय कृषी महोत्सवात पनवेलच्या खाद्यसंस्कृतीचे दर्शन

**खारघर : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कृषी महोत्सवाला गुरुवारी पालकमंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरुवात झाली. जवळपास १५० स्टॉल्स या प्रदर्शनात होते.

पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांनादेखील या महोत्सवामुळे चांगले व्यासपीठ मिळाले. तालुक्यातील चिंचवण गावातील शिवकन्या महिला उत्पादन गटाच्या माध्यमातून स्टॉल क्र. ८१ वर स्थानिक खाद्यपदार्थ तसेच रोपे याठिकाणी ठेवण्यात आली. महिला गटाच्या अध्यक्षा मोहिनी अनंता पोपटा या याठिकाणी स्वतः उपस्थित होत्या. त्यांच्यासोबत विद्या पाटील, ज्योत्स्ना पाटील, वृषाली पाटील या गटाच्या माध्यमातून स्वतः उत्पादित केलेले पापड, लोणचे, अगरबत्ती, भाजीपाला, शोभेच्या तसेच फळभाज्यांचे रोपटे याठिकाणी विक्रीसाठी ठेवले होते. तीन दिवसांत हजारो नागरिकांनी या महोत्सवाला भेट दिली.

खराब वातावरणात शेतीचे झालेले नुकसान लक्षात घेता अशाप्रकारे महोत्सव आयोजित करून शेतकऱ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे प्रगतशील शेतकरी चंद्रकांत भगत आणि मिनेश गाडगीळ यांनी या महोत्सवाचे कौतुक केले.



# व्हाईस चेअरमनपदी निवडीबद्दल भूपेंद्र बारसिंग यांचा सत्कार



**सांगली : प्रतिनिधी**

खानापूर तालुक्यातील नावाजलेल्या मनमंदिर सहकारी नागरी पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी भूपेंद्र बाबुराव बारसिंग यांची निवड झाली आहे. याबद्दल त्यांचा माहुली गावात हृद्य सत्कार करण्यात आला.

मनमंदिर सहकारी नागरी पतसंस्थेची बैठक सोमवारी (दि. १३) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, खानापूर कार्यालय विटाचे सहकार अधिकारी श्री. काळेबाग यांच्या अध्यतेखाली झाली. या बैठकीस पतसंस्थेचे व्यवस्थापक दिलीप पवार, प्रशासन अधिकारी सुनील माने हेही उपस्थित होते. या वेळी पतसंस्थेच्या चेअरमनपदी अशोक गायकवाड, तर व्हाईस चेअरमनपदी भूपेंद्र बारसिंग यांची एकमताने निवड करण्यात आली. याशिवाय शशिकांत तारळेकर, मन्सूर पटेल, राजाराम पवार, सुधीर सुतार, जयदीप पदमन, विकास आबदर, विद्युलता पवार, उषा शितोळे, लक्ष्मण गायकवाड यांची संचालकपदी निवड झाली. सर्व नवनियुक्त संचालकांचा मनमंदिर बँकेचे चेअरमन तथा माजी उपनगराध्यक्ष अजित गायकवाड यांनी सत्कार केला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. 'मनमंदिर'च्या सर्व कर्मचाऱ्यांनीही याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

दरम्यान, भूपेंद्र बारसिंग यांचा निवडीबद्दल माहुली गावात जाहीर सत्कार करण्यात आला. या वेळी माजी सरपंच तथा विद्यमान पोलीस पाटील नंदकुमार माने, उपसरपंच डॉ. देवेंद्र बारसिंग, माजी सरपंच राजेंद्र बारसिंग, युवा नेते शकील तांबोळी, दत्तात्रेय बारसिंग, महेंद्र बारसिंग, युवराज बारसिंग, गोपाळ फाळके, तानाजी बारसिंग, सिकंदर आतार, माधव माने, सतीश माने, नाथबाबा बारसिंग यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते.

या वेळी पोलीस पाटील नंदकुमार माने म्हणाले की, भूपेंद्र बारसिंग हे मनमंदिर को. ऑप. बँकेच्या विटा शाखा व्यवस्थापकपदी कार्यरत असून आता त्यांची मनमंदिर पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल आम्हा सर्वांना अभिमान आहे. बारसिंगसाहेब हे एक सामाजिक बांधिलकी जपणारे तसेच शांत व मनमिळावू असे व्यक्तिमत्त्व आहे. मदत करणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. मोठा भाऊ इंजिनियर, लहान भाऊ डॉक्टर आणि हे बँकींग क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. सर्व कुटुंब सुसंस्कृत आणि उच्चशिक्षित असल्याने त्यांच्या परिवाराचा आदर्श आपण सर्वांनी घेतला पाहिजे. सत्कार समारंभाचे प्रास्ताविक दत्तात्रेय बारसिंग यांनी केले, तर उपस्थितांचे आभार महेंद्र बारसिंग यांनी मानले.

# ऑनलाईन शिष्यवृत्तीसाठी मुदतवाढ द्यावी -दशरथ भगत



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गरीब व गरजू विद्यार्थी शिष्यवृत्ती लाभापासून वंचित राहू नयेत यासाठी ऑनलाईन शिष्यवृत्तीची द्वितीय टप्प्याच्या प्रक्रियेकरिता दोन महिने मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी नवी मुंबई मनपा माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांनी उपायुक्तांना एका निवेदनाद्वारे केली आहे.

यावर्षी प्रथमच नवी मुंबई मनपाने विद्यार्थ्यांची ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रिया सुरू केल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये गोंधळ निर्माण झाला होता, मात्र नागरिकांच्या वतीने आपण प्रशासनाकडे मागणी केल्याने शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी वाढीव मुदत देण्यात आली. शिष्यवृत्तीकरिता बँक पासबुक, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, शाळा व महाविद्यालयांचे घोषणापत्रे तसेच इतर पुरावे याकरिता अद्यापही विलंब होत आहे.

या समस्यांचा विचार करून अर्ज भरणा प्रक्रियेसाठी मुदतवाढ करीत पुढील दोन महिने सुरू ठेवावी, अशी मागणी नवी मुंबई उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार यांच्याकडे एका निवेदनात केली आहे. शिष्यवृत्ती मुदतवाढविषयी उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार यांना विचारले असता, शिष्यवृत्ती मुदतवाढ अर्ज प्राप्त झाला असून यावर आयुक्त आज रात्री उशिरापर्यंत सकारात्मक निर्णय घेतील असे सांगितले.

पान १ वरून

## सर्व क्षेत्रांच्या समृद्धीसाठी विकासाच्या रोडमॅपद्वारे कामे

नवी मुंबई विमानतळ आणि ट्रान्स हार्बर लिंकची उभारणी याद्वारे तिसरी मुंबई आकाराला येत आहे. मच्छीमारांचे हित जोपासत वाढवण बंदराची उभारणी करण्यात येत आहे. या बंदरामुळे निर्यात क्षमता वाढणार आहे. ग्लोबल सप्लाय चेनचा भाग आपण आता झालो आहोत, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हणाले.

जलयुक्त शिवार-एकद्वारे ३९ लाख हेक्टर जमीन रब्बीच्या पिकाखाली आली. जलयुक्त शिवार-दोनच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे करीत कृषी क्षेत्राला अधिक चालना देण्यात येत आहे. समुद्रात वाहून जाणारे पाणी वळण बंधाऱ्यांच्या माध्यमातून, टनेल टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून गोदावरी खोऱ्यातील भागात आणत आहोत. याद्वारे मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्याचे काम करण्यात येत आहे. गोसेखुर्दच्या वाहून जाणाऱ्या पाण्याद्वारे पश्चिम विदर्भातील दुष्काळी जिल्हे दुष्काळमुक्त करण्यात येणार आहेत. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या माध्यमातून कृषी आणि ग्रामविकासाला अधिक बळकट करण्यात येत आहे. आधुनिक पद्धतीने शेती कशी करता येईल या दृष्टीने अधिक विचार करण्यात येत आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने ग्री बिजनेसद्वारे गावातील प्राथमिक कृषी सोसायटी बहुउद्देशीय बनविण्यात येत आहेत. त्यांना ग्री बिझनेस सोसायटी करण्यात येत आहे. याद्वारे कृषी क्षेत्रात मूल्यसंवर्धन होऊन त्याचा फायदा शेतकऱ्यांना होईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

शालेय आणि उच्च शिक्षणातही दर्जा वाढ करण्यात येत आहे. आरोग्य क्षेत्रातील सुविधांमध्येही आमूलाग्र बदल घडवून आणण्यात येत आहे. समाजातील सर्व वंचित घटकांपर्यंत पिण्याचे शुद्ध पाणी व त्यांना घरांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी सांगितले.

# डम्पिंग ग्राउंडवरील कचऱ्याला आग

## धुरामुळे अलिबागकरांचा श्वास कोंडला



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगर परिषदेच्या डम्पिंग ग्राउंडवर सोमवारी (दि.३) रात्री आग लागली. या आगीमुळे अलिबाग शहरात धूर पसरला होता. मंगळवारी सकाळी १० वाजेपर्यंत शहरातील अनेक भागात धुराचे साम्राज्य पसरले होते. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

अलिबागजवळील गोविंद बंदर परिसरात नगरपालिका आणि आसपासच्या ग्रामपंचायती खाडीलगतच्या परिसरात कचरा टाकतात. कचऱ्याची योग्य विल्हेवाट न लावता बरेचदा कचऱ्याला आग लावली जाते. सोमवारी रात्री या डम्पिंग्र ग्राउंड परिसरात आग लागली होती. ज्यामुळे धुराचे लोट शहरालगत परिसरात पसरले होते. मध्यरात्रीच्या वेळी कोंदट वातावरण तयार झाले होते. सकाळीही धूर आणि धुक्याची चादर संपूर्ण शहरावर परसरली होती. धुरामुळे डोळे चुरचुरणे, धुरकट वासाचा त्रास जाणवत होता. दहा वाजेपर्यंत हिच परिस्थिती कायम होती. डम्पिंग ग्राउंड परिसरात लागलेल्या आगीची सखोल चौकशी करावी, अशी मागणी केली जात आहे.


**अलिबाग नगरपालिका दरवर्षी कचरा व्यवस्थापनासाठी साडेसहा कोटी रुपयांचा खर्च करते. कचरा व्यवस्थापनासाठी एवढा निधी खर्च करूनही जर आग लागून कचऱ्याची विल्हेवाट लावली जात असेल आणि जनतेचे आरोग्य धोक्यात येत आहे ही खेदजनक बाब आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई व्हायला हवी.**

**-संतोष सावंत, सामाजिक कार्यकर्ते**

## दुखवटा

### सुशीला शिर्के

**पनवेल :** म्हसळा माजी शिवसेना तालुकाप्रमुख नंदू शिर्के यांच्या मातोश्री सुशीला शिर्के यांचे वयाच्या ९५व्या वर्षी मौजे शिर्के ताम्हाणे, म्हसळा येथील राहत्या घरी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे मोठा मुलगा रायगड जि. प. बांधकाम इंजिनिअर संघटनेचे माजी अध्यक्ष सदानंद शिर्के, शिवसेना शाखाप्रमुख पनवेल चंद्रकांत शिर्के, माजी म्हसळा तालुकाप्रमुख नंदू शिर्के, दोन मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.





## शिपाई पाहिजे

श्री गोपाळ कृष्ण वाचनालय उरण येथे शिपाई पद भरावयाचे आहे. तरी इच्छुक उमेदवाराने आपल्या अर्ज व अपेक्षासह वाचनालयाचे अध्यक्ष किंवा ग्रंथपालाशी संपर्क साधावा.

सही
ॲड. पराग म्हात्रे
अध्यक्ष
मो. : ९८६९२०५४१२

सही
जिजा घरत
ग्रंथपाल
मो. : ९८१९१९०७२३

# खारघरमध्ये उघड्यावर जाळला जातोय कचरा; कारवाईची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

उघड्यावर कचरा जाळणे हा पर्यावरण संरक्षण कायदा आणि भारतीय दंड विधानानुसार गुन्हा आहे. त्यासाठी कठोर दंडात्मक तरतूद करण्यात आली आहे, मात्र सेंट्रल पार्कच्या मोकळ्या भूखंडावर कचरा टाकून जाळला जात आहे. त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खारघरमधील नागरिक करीत आहेत.



खारघर परिसरातील गावे आणि वसाहतीमधील घनकचरा पालिकेकडून उचलला जातो. तो कचरा सिडकोने राखीव ठेवलेल्या खारघर कार्पोरेट पार्कच्या भूखंडावर एकत्र केला जातो. त्यानंतर तो कचरा घोट येथील डम्पिंगमध्ये आणला जातो. गाव आणि वसाहतीमधील नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सेंट्रल पार्क भाग दोनसाठी राखीव असलेल्या जागेवर टाकून पसार होतात. काही दिवसांनंतर सकाळ किंवा दुपारच्यावेळेस हा कचरा पेटवला जातो. त्यामुळे प्रदूषण तर होतेच; शिवाय जवळपास असणाऱ्या झाडांनीही इजा होत आहे.

> **पनवेल महापालिकेकडे कचरा वर्गीकरणासाठी मोठ्या प्रमाणात जागा आहे. तरीही पालिकेकडून कचरा जाळला जात नाही, मात्र, बाहेरील व्यक्ती कचरा टाकून जाळत असेल, तर अशा व्यक्तींवर कारवाई केली जाईल.**
>
> –डॉ. वैभव विधाते, सहायक आयुक्त

दरम्यान, तळोजा एमआयडीसीमधून सोडल्या जाणाऱ्या रसायनयुक्त उग्रवासामुळे नागरिक त्रस्त असताना आता खारघर परिसरात मोकळ्या जागेत कचरा टाकून प्रदूषण केले जात असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

# पनवेलमध्ये पथदिव्यांवर तिरंगी रोषणाई

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीत शहर सौंदर्यीकरण योजनेंतर्गत विविध ठिकाणी रस्त्यावरील विजेच्या खांबावरे तिरंगी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्यामुळे हे परिसर रात्री आकर्षक दिसत आहेत. ते पहाण्यासाठी नागरिक मुलांना घेऊन फिरताना दिसत आहेत.



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शहर सौंदर्यीकरण योजनेंतर्गत शासनाने प्रत्येक शहरात विद्युत रोषणाई करण्यास सांगितले आहे. त्यामुळे पनवेल महापालिका क्षेत्रात ही विविध ठिकाणी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

खारघमध्ये कोपरा पूल ते खारघर डिमार्ट, हिरानंदानी ते बँक ऑफ इंडिया, शिल्प चौक ते डेली बाजार; कामोठेमध्ये अंडरपास ब्रीज ते कामोठे पोूहस स्टेशन रोड; कळंबोलीत फायरब्रीगेड रोड, कळंबोली–रोडपाली जंक्शन; पनवेलमध्ये खांदा कॉलनीचा अंडरपास ब्रीजवरील रोड, खांदा कॉलनी ते खांदेश्वर स्टेशन रोड, नवीन पनवेल एचडीएफसी बँक चौक या ठिकाणी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

याशिवाय महापालिका कार्यक्षेत्रातील विविध ब्रीज, फ्लायओव्हर यांच्यावरतीही विद्युत रोषणाई अंतर्गत थीम लायटिंग करण्यात येणार आहे. त्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे.

# ग्रंथालय विकास व वाचन चळवळीबाबत मार्गदर्शन



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ग्रंथालय विकास व वाचन चळवळ या विषयावर कार्यक्रम झाला.

यात महात्मा गांधी विद्यालय व स्वर्गीय रा. ना. ठाकूर कला उच्च माध्यमिक विद्यालय दिघोडे येथे उरण महाविद्यालयाच्या वतीने एकूण ३६ हजार रुपयांची पुस्तके भेट देण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी चांगल्या पुस्तकांचे वाचन करून व्यक्तिमत्व घडवले पाहिजे असे सांगितले. प्रा. के. ए. शामा यांनी वाचनाचे व्यसन विद्यार्थ्यांनी लावले पाहिजे, असे प्रतिपादन केले. नाथा नाईक यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण यांनी, सूत्रसंचालन आदिती पाटील हिने केले, तर आभार मोकल यांनी मानले. विद्यार्थ्यांच्यामध्ये वाचन संस्कृती विकसित व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस प्रमुख डॉ. डी. पी. हिंगमिरे यांनी केले होते.

# खारघरमध्ये गजानन महाराज प्रकट दिन सोहळा

**खारघर, पनवेल : वार्ताहर,**

खारघर पत्रकार संघाचे सचिव तसेच सार्थ लोकनितीचे संपादक संतोष वाव्हळ यांच्या निवासस्थानी सालाबादप्रमाणे यंदाही गजानन महाराज प्रकट दिन सोहळा धार्मिक वातावरणात झाला. यात पूजा, होम, हवन या धार्मिक विधीबरोबर भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन सुद्धा केले होते. यंदाचे ६ वे वर्ष असून या सोहळ्यास खारघरमधील राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पोलीस अधिकारी, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली.

या वेळी दर्शनासाठी आवर्जून उपस्थित भाजप खारघर–तळोजा मंडलचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल, पनवेल महापालिकेचे माजी सभापती प्रवीण पाटील, नगरसेवक शत्रुघ्न काकडे,



निलेश बावीस्कर, हरिश केणी, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, भाजप युवा मोर्चा खारघर व तळोजा मंडळ अध्यक्ष विनोद घरत, भाजप रायगड युवा मोर्चाचे पदाधिकारी समीर कदम, गीता चौधरी, अमर उपाध्याय, किर्ती नवघरे, किरण पाटील, घरकुल हौसिंग फेडरेशनचे प्रकाश देशमुख, खारघर युथ कौन्सिलचे संस्थापक सोरटे आणि सभासद मंडळ, प्रतिक्षा कदम, पोलीस अधिकारी क्राइम ब्रांच युनिट ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी, शाश्वत फाऊंडेशनच्या बिना गोगरी, जयेश गोगरी तसेच महाराष्ट्र राज्य वाहतूक सेनासह सरचिटणीस संदीप खोचरे, कळंबोली पोलीस स्टेशनमधील सर्व पोलीस महिला कर्मचारी, समाजसेविका पुणे येथील वंदना पिसे, पत्रकार विजय कडू, अप्पासाहेब मगर शंकर वायदंडे, असीम शेख, विशाल सावंत, तुर्भे चे विभाग प्रमुख प्रकाश चिकणे आदी उपस्थित होते.



**खारघर : सेक्टर ११ येथील जय हनुमान श्री शनैश्वर मंदिरामध्ये दिनेश खिर्डेकर व कार्तिकी चौधरी यांच्या वतीने श्री गजानन महाराज प्रकट दिन महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक प्रवीण पाटील, शत्रुघ्न काकडे, किर्ती नवघरे, दीपक शिंदे, प्रभाकर बांगर, लकेंदर सेनी, अनिल साबणे, अमर उपाध्याय, अक्षय लोखंडे आदी उपस्थित होते.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात शिक्षक पालक बैठक उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि.१४) तृतीय वर्षीय विद्यार्थ्यांच्या पालकांसोबत सोबत संवाद साधण्यासाठी शिक्षक पालक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीसाठी तृतीय वर्षीय विद्यार्थ्यांच्या पालकांना आमंत्रण देण्यात आले होते. वाणिज्य व विज्ञान विभागातील सुमारे १०० पालक या बैठकीसाठी उपस्थित होते.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित असलेल्या पालकांबरोबर संवाद साधला व सर्वांना महाविद्यालयातील विविध उपक्रमाबद्दल विशेष माहिती देत असताना महाविद्यालयातील सुरू असणाऱ्या विविध कोर्सेस बद्दल तसेच राबविण्यात येणारे कार्यक्रम व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळवलेले यश व भविष्यामध्ये राबवण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रम बद्दल सविस्तर माहिती दिली व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी तसेच भविष्यात सर्वांनी विविध क्षेत्रांमध्ये यश संपादन करावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी सर्व विभागाचे विभाग प्रमुख व वर्ग शिक्षकांनी पालकांसोबत संवाद साधला व विविध कोर्सच्या व परीक्षा सत्रांची सविस्तर माहिती दिली त्याचबरोबर पालकांनी सुद्धा आपले विचार मांडले तसेच सर्व शिक्षकांनी पालकांच्या विचारांचे व अपेक्षांचे आदर करीत ते पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. या वेळी अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षेच्या समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे व सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीचे आयोजन शिक्षक पालक संघटनेच्या समन्वयक डॉ. दीपिका हसीजा (विज्ञान विभाग) व प्रा. तनुजा सुमन (वाणिज्य विभाग) यांनी केले तसेच सर्व विभाग प्रमुख सर्व शिक्षकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



**पनवेल : तालुक्यातील शिवाजीनगर येथील रूपेश महादेव ठाकूर यांच्या निवासस्थानी सालाबादप्रमाणे यंदाही श्री सत्यनारायण महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. या पुजेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, बहिण राधाताई ठाकूर, तुलसाबाई घरत, बंधू कान्हाशेठ ठाकूर, वैभव ठाकूर, देवकुबाई ठाकूर, जयश्री पाटील, मितल ठाकूर आदी उपस्थित होते.**

(छाया : अक्षय शार्दुल)



**पनवेल : शहरातील मिरची गल्ली येथील समर्थ नगरमध्ये श्री समर्थ मित्र मंडळाच्या वतीने श्री म्हसोबा मंदिर अभिषेक सोहळ्याचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. यानिमित्त श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजिण्यात आली होती तसेच ओमकारेश्वर महिला भजनी मंडळाच्या वतीने भजनही सादर झाले. या सोहळ्याला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी संतोस गुजारे, पिंटू तांबोळी, किरण नाईक, दीपक सोनटक्के, प्रदीप साखरे, अलोक सपने आदी उपस्थित होते.**

# ब्रह्मचैतन्य संगीत सभेत श्रीरंग भावेंचे गायन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेमध्ये प्रसिद्ध आकाशवाणी कलाकार श्रीरंग भावे यांचे गायन झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रामधे हा कार्यक्रम झाला.



आपले आईवडील सरिता व राजेंद्र भावे, तसेच ग्वाल्हेर घराण्याचे डॉ. राम देशपांडे व पं. सुरेश बापट आणि पं. रामदास कामत यांच्याकडे संगीताचे धडे घेतलेल्या श्रीरंग भावे यांनी अत्यंत सुरेल, सुस्पष्ट आणि गोड स्वरांनी ब्रह्मचैतन्य संगीत सभेचे हे पंधरावे पुष्प रंगवले.

आजच्या मैफिलीची सुरुवात 'सूर निरागस हो' या गाण्याने केली आणि मैफिलीचे प्रसन्न वातावरण निर्माण केले. त्यानंतर आरंभी वंदिन, कुश लव रामायण गाती ही पदे व रामभक्तीपर अभंग सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या प्रवचनांवर आधारित दोन स्वरचित रचना अतिशय भावपूर्ण पध्दतीने सादर करून वातावरण भक्तिमय केले. त्यानंतर विविध नाट्यपदे सादर करून 'चिन्मया सकल हृदया' या पदाने गायनाची सांगता केली.

अमेय भडसावळे यांनी ऑर्गन, गणेश घाणेकर यांनी तबला, सुरज गोंधळी यांनी पखवाज व समीर कर्वे यानी तालवाद्यसाथ केली. पर्णिका भडसावळे–जोशी यांनी अभ्यासपूर्ण निवेदन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

# पनवेलच्या शाळांमध्ये मोफत प्रवेश नोंदणी पूर्ण

**खारघर : प्रतिनिधी**

२०२३–२४या वर्षासाठी विनाअनुदानित शाळांमधील २५ टक्के जागांवर मोफत प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार आहे. याअंतर्गत शाळा नोंदणीची प्रक्रिया प्रत्येक जिल्ह्यात सुरू झाली आहे. पनवेल तालुक्यात शाळांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागा वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे. दरवर्षीप्रमाणे आरटीई प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन राबविण्यात येत आहे.

पनवेल तालुक्यातील शाळांची नोंदणी पूर्ण झाली आहे. चार ते पाच दिवसांत आरटीई ची प्रवेश प्रक्रियेसंदर्भात नोटिफिकेशन निघणार आहे. दरम्यान, आत्तापर्यंत तालुक्यातील सर्वच विनाअनुदानित शाळांची नोंदणी पूर्ण झाली आहे.

११० शाळांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. चार ते पाच दिवसात याबाबत नोटिफिकेशन निघेल त्यानंतर प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होईल, असे पनवेल शिक्षण विभागाचे वरिष्ठ विस्तार अधिकारी एस. आर. मोहिते यांनी सांगितले आहे.



**नवीन पनवेल : येथे शिवश्री साई मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त भव्य साई भंडाऱ्याचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. या वर्धापन दिनानिमित्त गजर साईनाथांचा हा कार्यक्रम झाला. माजी नगराध्यक्ष सुनील घरत यांच्या माध्यमातून आयोजन करण्यात आलेल्या या सोहळ्याचे यंदाचे हे १५वे वर्ष होते. या सोहळ्याला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी माजी नगरसेवक समीर ठाकूर, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, भाजप नेते जगदीश घरत आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# क्रिकेटनभीच्या तारका!

भारतीय समाज जगभरातला आघाडीचा क्रिकेटप्रेमी असला तरी आपण साऱ्यांनी नेहमीच महिला क्रिकेटला दुय्यम स्थान दिले. म्हणायला गेली कित्येक वर्षे महिलांसाठीच्या कसोटी स्पर्धा, एकदिवसीय सामने आदी पार पडत आले, पण महिला क्रिकेटपटूंनी किती खडतर परिस्थितीत आपला खेळ सुरू ठेवला हे त्याच जाणतात. अलीकडच्या काळात महिलांसाठीच्या वीस षटकांच्या लढतीही सुरू झाल्या, पण महिला क्रिकेट खऱ्या अर्थाने नावारूपाला येण्यासाठी त्याला आयपीएलसारख्या वलयाची गरज होती आणि भारतातल्या महिलांच्या पहिल्यावहिल्या आयपीएल अर्थात डब्ल्यूपीएलने क्रिकेटविश्वात महिलांची खरी दमदार वाटचाल सुरू झाली आहे.

**पुढच्या महिन्यात आंतरराष्ट्रीय महिला दिन आहे. अनेक ठिकाणी त्यासाठीच्या कार्यक्रमांची तयारी सुरू झाली आहे. स्त्री-पुरुष समानतेचे गोडवे गाण्याचा हा मौसम. तो येण्याच्या जवळपास महिनाभर आधीच खऱ्याखुऱ्या स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने क्रिकेटविश्वाने एक पाऊल पुढे टाकले आहे. भारतीय क्रिकेट बोर्डाचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली यांनी महिला क्रिकेटचे सामने वाढवले. त्यानंतरच महिलांची आयपीएल झाली पाहिजे अशी चर्चा सुरू झाली. आता अखेर ही लीग मार्चमध्ये होणार आहे. त्यासाठी सोमवारी पहिल्यांदाच पाच संघांच्या मालक-मालकिणींनी बोली लावून आपल्या संघातील क्रिकेट तारकांची निवड केली. यात भारताची आघाडीची फलंदाज स्मृती मानधनाला सर्वाधिक ३.४ कोटी रूपयांचा करार मिळाला. सांगलीनजीकच्या स्मृतीसाठी रॉयल चॅलेंजर्स ऑफ बंगळुरू या संघाने ही भलीमोठी रक्कम मोजली आहे. महिला क्रिकेटपटूंसाठीच्या या पहिल्याच लिलावात पाच संघांनी मिळून तब्बल ८७ कोटी रूपयांहून मोठी रक्कम खर्च केली. स्मृतीला मिळालेली रक्कम महिला खेळाडूंमध्ये खूप मोठी असली तरी काही जण त्याची तुलना पुरुषांच्या आयपीएलशी करीत आहेत. पुरुष क्रिकेटपटूंच्या तुलनेत महिला खेळाडूंना मिळालेल्या रकमा काहीच नाहीत हे कुणीही नाकारणार नाही, पण ही तर निव्वळ सुरूवात आहे. त्यामुळे या साऱ्याचेच सकारात्मकतेने स्वागत करायला हवे. महिला लीग अद्याप बाल्यावस्थेत आहे, मात्र आयपीएलसारखीच ही लीगही नावारूपाला येणार याची खात्री या क्षेत्रातील सर्व जाणत्या मंडळींना वाटते. यातला परदेशी खेळाडूंचा सहभाग महिला क्रिकेटच्या प्रगतीला मोठा हातभार लावेल यात शंका नाही. जेमिमा रॉडरिग्ज, शेफाली वर्मा आदी आणखी काही क्रिकेटतारकांचे करार कोटींच्या घरातले आहेत. भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरसाठी मुंबई इंडियनने १.८ कोटी रुपये मोजले. सर्वाधिक रकमेचा करार मिळवणाऱ्या भारतीय क्रिकेटतारकांच्या यादीत ती पहिल्या सहा खेळाडूंमध्येही नाही. तिच्यासारख्या अनुभवी खेळाडूकरिता हे निश्चितच निराशाजनक आहे. अर्थात इथून पुढे भारतीय क्रिकेटच्या साऱ्याच तारकांना दरवर्षी स्वत:ला सिद्ध करावे लागणार आहे. सत्तरच्या दशकात भारतातील महिला क्रिकेट खेळू लागल्या तेव्हापासून भारतीय महिला क्रिकेटचा मार्ग आजवर खडतरच राहिला आहे. डायना एडुलजी, शांता रंगास्वामी, मिताली राज या महिला क्रिकेटपटूंनी या कठीण काळात आपला खेळ नुसता सुरू ठेवला नाही तर आपली गुणवत्ताही सिद्ध केली. अलीकडच्या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय महिला क्रिकेटपटूंनी स्वत:ला सिद्ध केल्यानंतरच भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने त्यांच्याकडे नीट लक्ष देण्यास सुरूवात केली. त्यात आयपीएल हा खेळापेक्षाही व्यवसायच अधिक आहे हे सारेच जाणतात. आपल्या लक्षवेधी कामगिरीने महिला क्रिकेटपटूंनी त्यात स्वत:साठी स्थान मिळवले आहे हे मान्य करावेच लागेल.**

# परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी कॉपीमुक्त अभियान


(संग्रहित छायाचित्र)

## खबरबात
नितीन देशमुख

दहावीच्या परीक्षेचा निकाल लागला होता. नेहमी पन्नास टक्के ही गुण न मिळणाऱ्या मुलाला ९० टक्के गुण मिळाल्याने त्याचे पालक पेढे वाटत होते. त्यावेळी कोणी तरी म्हणाले याने तर कॉपी करून ९० टक्के मिळवले. त्याच्या शिक्षक असलेल्या पालकांनी लगेच प्रत्त्युतर दिले गुण कसे मिळवले यापेक्षा किती मिळाले याला महत्त्व आहे. प्रवेशाच्या वेळी कोणी विचारणार नाही गुण कसे मिळवलेस. हे सगळे आठवण्याचे कारण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे या वर्षी फेब्रुवारी व मार्च महिन्यात होणाऱ्या इयत्ता बारावी व इयत्ता दहावीच्या परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रांवर कोणत्याही प्रकारचे गैरमार्ग प्रकार होऊ नये यासाठी कोकण विभागात कॉपीमुक्त अभियान राबविण्याचा येणार आहे.

इयत्ता बारावी व इयत्ता दहावी या विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण टप्प्यावरील परीक्षा निकोप वातावरणात होण्यासाठी व त्यातून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी हे महत्त्वपूर्ण अभियान राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी)ची परीक्षा दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ ते २१ मार्च २०२३ या कालावधीत तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (दहावी)ची परीक्षा २ मार्च २०२३ ते २५ मार्च २०२३ या कालावधीत घेण्यात येणार आहे. या परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रांवर होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी शासनाच्या विविध विभागांच्या समन्वयातून कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत परीक्षा केंद्रांवर कोणत्याही प्रकारचे गैरमार्ग प्रकार होणार नाहीत. याबाबत विद्यार्थी, पालक, शिक्षक, संस्थाचालक यांचे उदबोधन करण्यात येणार असून, या अभियानाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. हे अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी तसेच परीक्षा सुरळीत व सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी विभागनिहाय व जिल्हानिहाय भरारी पथक, दक्षता समिती आणि बैठे पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कॉपीमुक्त अभियान हा उपक्रम निश्चितच चांगला आहे, पण ते यशस्वी करणे वाटत तितके सोपे निश्चितच नाही. कारण विद्यार्थ्यांना कॉपीला मदत करण्यासाठी संस्था चालक, शिक्षक आणि कोचिंग क्लासवाले यांची मोठी लॉबी कार्यरत आहे. संस्था चालकांना आपल्या शाळेचा निकाल १०० टक्के लागला तर प्रवेशाचे वेळी मिळणारे डोनेशन व कोचिंग क्लासवाल्यांना आपल्या क्लासमध्ये मोठी फी घेणे या टक्केवारीवरच अवलंबून असते. पालकानाही आपल्या मुलाचे टक्के महत्त्वाचे असतात. ते कसे मिळाले कोणी विचारात नाहीत, अशी पालकांची धारणा आहे. त्यामुळे त्यांचे सहकार्य मिळण्याची शक्यता फारच कमी आहे.

रायगडमध्ये अशा काही शाळा आहेत तिथे कॉपी करायला मिळते म्हणून दहावी व बारावीसाठी अनेक पालक घराजवळची शाळा सोडून ५० किमी पेक्षा जास्त अंतरावर असलेल्या शाळेत आपल्या मुलाला घालतात किवा परीक्षेसाठी तरी ते केंद्र घेतले जाते. अनेक कोचिंग क्लासवालेही पालकांना अशा शाळेत मुलांना परीक्षेला पाठवण्याचा सल्ला देतात. तेथील शिक्षकांशी त्यांचे लागेबंधे असतात त्यामुळे त्यांच्या मुलांना कॉपी पुरवली जाते. या संस्था चालकांचेही वरपर्यंत लागेबांधे असतात. त्यामुळे कधीच त्यांच्यावर कारवाई झालेली दिसत नाही. अलिबागहून पथक निघाले की ते आज कोठे येणार आहे त्यामध्ये कोण-कोण आहे त्यांच्या गाडीचा नंबर याची माहिती त्यांना मिळते. आपल्या भागात येणार असल्यास शाळेच्या रस्त्यावर यांची माणसे बसवली जातात. गाडी आल्यास लगेच कळवले जाते त्याप्रमाणे नेमलेली माणसे ताबडतोब प्रत्येक वर्गात जाऊन सावध करतात. शाळेच्या गेटला कुलूप लावले जाते. पथक आल्यास त्याला शाळेत प्रवेश मिळण्यास वेळ लागतो. तोपर्यंत मुलांजवळ असलेली कॉपी गोळा करून बाहेर नेली जाते. समजा कॉपी पकडली तरी पकडणारा शिक्षकच असतो. एकमेका साह्य करू हे संस्था चालकांचे धोरण असल्याने त्याच्यावर त्याच्या संस्था चालकामार्फत दडपण आणले जाते.

दुसऱ्या प्रकारात केंद्र असलेल्या शाळा आपल्या शाळेतील हुशार विद्यार्थ्यांना एक वेगळाच ऐच्छिक विषय देतात. त्यामुळे त्यांचा गट वेगळ्या वर्गात बसवतात. त्याठिकाणी त्या विषयाचे शिक्षक सुपरवायझर नेमून विद्द्यार्थ्यांना मदत केली जाते. त्यामुळे पथकाला काहीच सापडत नाही. केंद्रातून उत्तर पत्रिकांचे गठ्ठे पोस्टाने तपासणीसाठी पाठवले जातात. यासाठी केंद्र प्रमुत्र, तेथील शिक्षक आणि शिपाई यांची भूमिका महत्वाची असते. अनेक पालक त्यांना पैसे देऊन आपल्या मुलाची उत्तर पत्रिका कोणाकडे गेली याची माहिती घेऊन त्या शिक्षकापर्यंत पोहचतात. त्याठिकाणी कोऱ्या सोडलेल्या जागेवर योग्य उत्तर लिहिले जाते. त्यामुळे नेहमी वर्गात शेवटी असलेल्या मुलांना ८० टक्के पेक्षा जास्त गुण मिळालेले अनेकदा पाहायला मिळते.

कॉपीमुक्त अभियान हा उपक्रम चांगला आहे पण तो राबविणे अवघड आहे. त्यासाठी भरारी पथकात, जिल्हा परिषद कर्मचारी व शिक्षकांची नेमणूक न करता सामाजिक संस्था, पत्रकार व इतर विभागातील कर्मचारी घ्यावेत. शासकीय गाडी न वापरता रोज वेगवेगळ्या खाजगी गाड्यांचा वापर करावा. कर्मचारी ज्या भागातील रहिवाशीअसतील तेथे न पाठवता त्यांना दुसऱ्या विभागात पाठवावे असे केल्याने शंभर टक्के नाही तरी पन्नास टक्के तरी अभियान यशस्वी होईल.

या अभियानास यशस्वी करण्यासाठी लोकप्रतिनिधी ते स्थानिक स्तरावरील सरपंचांपर्यंत सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.




# गुड न्यूज! आता देशाबाहेरही करू शकता युपीआय पेमेंट




डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म फोनपे ने एक नवीन सर्विस सुरू करीत असल्याची घोषणा केली आहे. यूजर्सला आता यूपीआयच्या माध्यमातून इंटरनॅशनल पेमेंट करण्याची सुविधा मिळू शकणार आहे. जर तुम्ही अन्य दुसऱ्या देशात जात असाल तसेच त्या ठिकाणी काही खरेदी करायची असेल तर तुम्ही फोन पेवरून पेमेंट करू शकता.

**या देशांत करू शकता पेमेंट**

नवीन सुविधेची सुरुवात करताना कंपनीने सांगितले की, फोन पे यूजर्सला आता सिंगापूर, संयुक्त अरब अमीरात (यूएई), भुतान आणि नेपाळ मधील कोणत्याही आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्याला पेमेंट करता येवू शकते. ज्यांच्याकडे स्थानिक क्यूआर कोड आहे. कंपनीची नवीन सुविधेला एआयपीएल (एनपीसीआय इंटरनॅशनल पेमेंट्स लिमिटेड)ची मदतीने घेतली आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, लवकरच अन्य देशात यूपीआय पेमेंटला सक्षम केले जावू शकते.

**यूपीआय इंटरनॅशनल**

फोन पेच्या म्हणण्यानुसार, कंपनी लवकरच यूपीआय इंटरनॅशनल पेमेंट सर्विसला अन्य देशात आणण्याची योजना बनवत आहे. भारतीय राष्ट्रीय भुगतान निगम (NCPI) ने वरील देशात इंटरनॅशनल यूपीआय पेमेंटच्या समर्थनाची घोषणा केली आहे.

**असा करता येणार वापर**

झहेपशझश यूजर्सला यासाठी प्रवासाआधी आपल्या फोन पे ॲपवर यूपीआय इंटरनॅशनलला ॲक्टिवेट करावे लागेल. यासाठी यूजर्स यूपीआय बँक अकाउंटला लिक करू शकतात. कंपनीच्या म्हणण्यानुसार ही प्रक्रिया सुरक्षित आहे. सर्विसला ॲक्टिवेट करण्यासाठी यूजर्सला आपला यूपीआय पिन टाकावा लागेल. कंपनीच्या म्हणण्यानुसार, हे पेमेंट भारतीय बँकांचे उपयोग केला जावू शकतो. तसेच ज्यांना पैसे पाठवले त्यांना त्यांच्या करन्सीमध्ये पैसे मिळतील. हे इंटरनॅशनल क्रेडिट, डेबिट आणि फॉरेक्स कार्डच्या आवश्यकतेला समाप्त करू शकते.

# मराठीतील क्रांतिकारी कवी नामदेव ढसाळ

## निमित्त



मराठी साहित्य परंपरेतील एक क्रांतिकारी कवी म्हणजे नामदेव ढसाळ. निधड्या छातीचा राजकीय नेता म्हणजे नामदेव ढसाळ. तरुणांसाठी दीपस्तंभासारखे व्यक्तिमत्त्व म्हणजे नामदेव ढसाळ. साठीच्या दशकातला तो एक असा कवी होता, की ज्याने मराठी साहित्यातील कवितेला एक नवे परिमाण मिळवून दिले. 'दलित पँथर'चे संस्थापक-अध्यक्ष नामदेवराव ढसाळ यांच्या जन्मदिनानिमित्त...

ढसाळ यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९४९ रोजी पुणे जिल्ह्यातील एका खेडेगावात झाला. त्यांच्या घरची परिस्थिती हलाखीची असल्याने ते लहानपणीच वडिलांसोबत मुंबईला आले. मुंबईतील गोलपीठा या रेड लाइट' भागात त्यांचे बालपण गेले. त्यांचे वडील खाटीक होते. त्यांनी स्वतः मुंबईमध्ये अनेक वर्षे टॅक्सी चालवली. ढसाळ ऐन तारुण्यातच दलित चळवळीकडे आकर्षित झाले. काव्य, गद्य आणि वृत्तपत्रीय स्तंभलेखनातून त्यांनी डॉ. आंबेडकरांचे विचार प्रभावीपणे मांडले. साहित्याच्या माध्यमातून दलितांच्या व्यथा, वेदनांना वाचा फोडणारे नामदेव ढसाळ दलित चळवळीचे बिनीचे शिलेदार होते. दलित पँथर' या आक्रमक संघटनेचे ते संस्थापक-अध्यक्ष होते. दलित चळवळीतील समवयस्क सहकाऱ्यांच्या सहकार्याने त्यांनी १९७२ मध्ये दलित पँथर'ची स्थापना केली. अमेरिकेतील ब्लॅक पँथर' चळवळीपासून त्यांनी प्रेरणा घेतली होती. दलितांसाठीचे अनेक प्रश्न त्यांनी हिरिरीने मांडले. कालांतराने या चळवळीत फूट पडली. अनेक नेत्यांनी आपापले पक्ष स्थापन केले, मात्र दलित पँथर'शी ढसाळ यांचं नातं अखेरपर्यंत कायम होते.

आंबेडकर चळवळीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी या सगळ्या अनुभवांची चिकित्सा केली आणि त्यातून त्यांची कविता अधिक क्रांतिकारी होत गेली. तिथून पुढे त्यांचे जीवन एक संग्राम बनले. साठीच्या दशकाच्या शेवटी महाराष्ट्रात दलितांवर मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार होत होते, पण त्यांची कुणीही दखल घेत नव्हते. त्या वेळी रिपब्लिकन पक्ष एकतर विकलांग झालेला होता किंवा तो सत्ताधाऱ्यांच्या दावणीला बांधलेला होता. अशा स्थितीत नामदेवरावांसह अनेक तरुण लेखक एकत्र आले आणि त्यांनी ब्लॅक पँथर'च्या धर्तीवर दलित पँथर' संघटना स्थापन केली. ज्या गावात अत्याचार व्हायचे, तेथे दलित पँथर' उग्र आंदोलन करायची. त्यामुळे महाराष्ट्राच्या खेडोपाड्यात दलित पँथर'चा दरारा वाढला आणि अन्याय, अत्याचारही कमी होत गेले.

नामदेवरावांचे वाचन विविधांगी होते. ते जसे वैचारिक लेखन वाचत, तसे मार्क्सवाद, इंग्रजीसह इतर साहित्याचीही आवडीने दखल घेत. या वाचनातून आणि अनेक मित्रांच्या चर्चेतून त्यांचे विचार घडत गेले. त्यांच्या लेखनाचे वेगवेगळ्या देशांतूनही स्वागत व्हायचे. वक्तृत्वाने अनेक माणसे खिळवून ठेवण्याची ताकद त्यांच्यात होती. त्यामुळे तो दलित मासेस'चा पुढारी झाला. तरुणवर्ग त्याच्याकडे अधिक आकर्षित होत गेले.

नामदेव ढसाळ यांचा पहिला कवितासंग्रह गोलपीठा' १९७३ मध्ये प्रकाशित झाला. यानंतर मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले', तुही यत्ता कंची?', खेळ' आणि प्रियदर्शिनी' हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. साहित्य जीवनगौरव पुरस्कार (२००४), पद्मश्री (१९९९) व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार' (२०१०) आदींनी त्यांना गौरविण्यात आले होते.

**नामदेव ढसाळ यांचे साहित्य**

कवितासंग्रह-गोलपीठा (१९७३), मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले (१९७५), खेळ (१९८३), तुही यत्ता कंची (१९८१), या सत्तेत जीव रमत नाही (१९९५), आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शिनी (१९७६), आंधळे शतक-मी भयंकराच्या दरवाजात उभा आहे, मी मारले सूर्याच्या रथाचे घोडे सात, तुझे बोट धरून चाललो आहे; नाटक-अंधार यात्रा; कादंबरी-हाडकी हाडवळा, निगेटिव स्पेस इत्यादी.

**(साभार : वेबसाईट)**

## क्लिक...क्लिक...!




पनवेल : महापालिका हद्दीत शहर सौंदर्यीकरण योजनेंतर्गत पथदिव्यांच्या खांबावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

## आरोग्य प्रहर

# जाणून घ्या धावल्याने शरीराला होणारे फायदे

पिळदार शरीर आणि उत्तम आरोग्य ठेवण्यासाठी धावण्याची अत्यंत गरज असते, पण धावतानाही काही गोष्टींची काळजी घेणे खूप गरजेचे असते. धावताना वेग किती असावा, किती वेळ धावावे, तसेच आरोग्याच्या दृष्टीने चांगला



रिझल्ट मिळवण्यासाठी धावताना सावधानताही बाळगावी लागते. वेगाने धावल्याने शरीराला कोणते फायदे होतात? तसंच धीम्या गतीने धावून लांबचे अंतर गाठल्यास काय फायदे होतात? याबाबत डॉ. सुधीर कामत यांनी सल्ला दिला आहे. धावणे म्हणजे एक आदर्श आहे, असं कामत यांनी म्हटले आहे.

डॉ. कामत यांनी ट्वीटरवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलेय, लाँग रन केल्यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. आरोग्य निरोगी राहण्याबरोबरच शरीर पिळदार राहते. जोरात धावण्यापेक्षा हळू धावणे नेहमीच फायदेशीर ठरते. कमी वेगात धाऊन जास्त अंतर पार करणेही आरोग्यास फायदेशीर असते.

आरोग्यविषयक समस्यांबाबत डॉ. आर आर दत्ता यांनीही सल्लामसलत केली आहे. खूप जास्त व्यायाम केल्यावर काही लोकं व्यायाम करताना खाली पडतात. खूप मेहनत घेणे सर्वच गोष्टींसाठी फायदेशीर नसते. वेगाने धावल्यानेही शारीरिक फायदे होतात, पण ज्या लोकांना उच्च रक्तदाब आहे, त्यांनी वेगानं धावणे टाळावे. अशा व्यक्तींना जोरात धावल्याने शरीरिक समस्येला सामोरे जावे लागू शकते. शरीर किती मजबूत आहे आणि किती कमकुवत आहे, हे तुम्हाला नेहमीच्या आरोग्य तपासणीत माहितंच होते. तुम्हाला रक्त दाबाचा त्रास असेल, तर काळजीपूर्वक व्यायाम करा. तुम्ही जोरात धावण्याऐवदी चालू शकता. दररोज एक तास चालल्याने काही लोकांनी वजन कमी केल्याची अनेक उदाहरणे समोर आहेत. धावण्याचा वेगाची मर्यादा ठेवा. योग्य पद्धतीने व्यायाम कसा करावा, यासाठी नेहमीच आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

वैज्ञानिकांच्या मते रोज केवळ सात मिनिटे हळूहळू धावण्याने आरोग्यास फायदा होतो. जे लोक धावण्याचा व्यायाम करीत नाहीत त्यांच्या तुलनेत तो व्यायाम करणाऱ्यांना हृदयविकार व पक्षाघातने मृत्यू येण्याची शक्यता कमी होते. धावण्याने मिळणारे हे फायदे तुम्ही किती दूर, किती सातत्याने धावता यावर अवलंबून नाहीत, लिंग, वय, बॉडी मास इंडेक्स, दारू पिणे व धूम्रपान करणे हे सर्व घटक धावण्याचे फायदे तुमच्यापासून हिरावून घेऊ शकत नाहीत याचा अर्थ दारू व धूम्रपान केले तरी चालते असे नाही कारण त्याचा आरोग्यावर फार वाईट परिणाम होत असतो.

# पक्ष बळकट करण्यासाठी योगदान द्यावे -प्रज्ञा ढवण

## पाली येथे भाजप जिल्हा महिला मोर्चाची बैठक उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप महिला प्रदेश सदस्य तथा जिल्हा बँक संचालिका प्रज्ञा ढवण यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि. १३) पाली येथे रायगड जिल्हा महिला आघाडी मोर्चाची कार्यकारिणी बैठक मोठ्या उत्साहात झाली.



भाजप महिला आघाडी मोर्चा रायगड जिल्हा प्रयुक्त पदाधिकारी, पेण तालुका सोशल मीडिया संयोजक निशिगंधा गुंड यांना प्रज्ञा ढवण यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. माणगाव तालुका अंगणवाडी सेविका प्रणाली प्रदीप मोरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी प्रज्ञा ढवण यांनी, आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने महिलांच्या संघटनाकरीता ध्येयधोरण आणि विचारधारेचा प्रचार करून पक्ष बळकट करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन केले.

रायगड जिल्हा महिला भाजप आघाडी अध्यक्ष हेमा मानकर यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यामध्ये रायगड जिल्हा महिला आघाडीच्या वतीने राबविण्यात आलेल्या लाभदायी उपक्रमाची माहिती दिली. त्याचप्रमाणे प्रत्येक महिला पदाधिकाऱ्याने केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा लाभ सामान्य जनतेला मिळवून दिला पाहिजे. त्याचप्रमाणे जिल्ह्यात येऊ घातलेल्या सर्व निवडणुकांमध्ये भाजप महिला आघाडी पूर्ण ताकदीने उतरून जास्तीत जास्त जागांवर विजय संपादित करून भाजप या जिल्ह्यात क्रमांक एकचा पक्ष ठरेल, असा विश्वास हे जिल्हाध्यक्ष हेमा मानकर यांनी व्यक्त केला.

या वेळी लोकसभा विस्तारक अविनाश कोळी, दक्षिण रायगड उपाध्यक्ष राजेश मपारा, श्रेया कुंटे, सरचिटणीस श्रद्धा घाग, उपाध्यक्ष वैशाली मपारा, सरचिटणीस वंदना म्हात्रे व जांभूळपाडाचे सरपंच श्रद्धा कानडे, नीलिमा भोसले, दीप्ती नकाशे, नंदा नाक्ते यांसह महिला आघाडी पदाधिकारी व सदस्या उपस्थित होत्या.

## ग्रंथालय संघाचे अधिवेशन उत्साहात

**म्हसळा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे ५७ वे वार्षिक अधिवेशन रविवारी (दि. १२) एमआयडीसी महाड येथे मोठ्या उत्साहात झाले. रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अमृत महोत्सवी वर्ष आणि सदविचार सार्वजनिक वाचनालय आसनपोई यांचे संयुक्त विद्यमाने झालेल्या अधिवेशनात संघाच्या स्मरणिकेचे प्रकाशन कृती समितीच्या शोभा सावंत आणि प्रमुख पाहुणे चेअरमन एमएमए संभाजी पठारे, संघाचे अध्यक्ष संजय बोंदार्डे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी श्रीकृष्ण बाळ, प्रकाश पाटील, संजय खांबेटे, नागेश कुलकर्णी, रामदास गायकवाड, पदाधिकारी, संचालक, ज्येष्ठ कार्यकर्ते उपस्थित होते.

## एसटी कर्मचाऱ्याशी वाद घालून पोलीस शिपायावर हल्ला

### तरुणाचा प्रताप; गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव ते श्रीवर्धनदरम्यान एका तरुणाने एसटी कर्मचाऱ्याशी वाद घालून त्यानंतर कारवाईसाठी आलेल्या पोलीस शिपायावर हल्ला करीत त्याचा चावा घेतल्याची घटना घडली आहे. याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. १३) सकाळी १०.४५ ते ११.३० वा. च्या दरम्यान एसटीचालक हे माणगांव ते श्रीवर्धन (बस क्र. एमएच १३ सीएच ६५४३) असे जात असताना डोंगरोली बसथांबा येथे आरोपी धीरज दिनेश केंद्रे, (वय २२, रा. विहुले कोंड) हा बसमध्ये चढत होता, मात्र बसचालक अविनाश पवार यांनी बसमध्ये खूप गर्दी असल्याने त्याला मागील बसने येण्यास सांगितले. या गोष्टीचा राग आल्याने आरोपी केंद्रे याने, मला बसमध्ये घेतले नाही, तर मी बसच्या पुढील काचा फोडतो, असे धमकावून खाली पडलेला दगड घेऊन एसटीच्या पुढे उभा राहिला व शिवीगाळ करू लागला. त्यानंतर आरोपीने १५ ते २० मिनिटे बस अडवून ठेवली. अखेर चालक, वाहकाने त्याला बसमध्ये चढण्यास सांगितले. बसमध्ये आरोपी हा एसटी इंजिनच्या बोनेटवर येऊन बसला. चालकाने त्याला मागे जाण्यास सांगितले. त्यावेळी आरोपीने पुन्हा शिवीगाळ केली. त्यानंतर चालक व वाहकांनी बस म्हसळा बायपास एसटी स्टँड येथे उभी करून कर्तव्यावर असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना घडलेला सर्व प्रकार सांगितला.

पोलिसांनी आरोपीला सोबत येण्यास सांगितल्यानंतर आरोपीने नकार देऊन पोलिसांसोबतही वाद घेतला. त्यावेळी पोलीस शिपाई कोथिंबरे हे आरोपीस हाताला धरून खाली उतरवत असताना आरोपीने सोबत असलेल्या पोलीस शिपाई सांगळे यांच्या तोंडावर पकडून चावा घेतला व कपाळावर ओरखडून जखम केली, तसेच त्यांचे टी-शर्ट फाडले. याबाबत माणगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## कर्जतमध्ये सोसायटीतील काँक्रीट रस्त्याचे उद्घाटन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरालगत असलेल्या ज्ञानदीप सोसायटीमधील मुख्य रस्त्याचे उद्घाटन आमदार महेंद्र थोरवे यांचे हस्ते झाले. या रस्त्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत सुमारे ८० लाखांचा निधी खर्च करण्यात आला आहे.

ज्ञानदीप सोसायटीमध्ये दरवर्षी पावसाळ्यात पाणी घुसते. त्या भागातील रहिवाशांनी यांबाबत काही महिन्यांपूर्वी आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन उपाययोजना करण्याची मागणी केली होती. त्यानंतर आमदार थोरवे यांनी कल्याण-कर्जत राज्यमार्ग रस्त्यावरून सोसायटीमध्ये जाणाऱ्या रस्त्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत सुमारे ८० लाख रुपये निधी उपलब्ध करून दिला.

या वेळी बाळासाहेबांच्या शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख भाई गायकर, विधानसभा मतदारसंघ संपर्क प्रमुख पंकज पाटील, तालुका प्रमुख संभाजी जगताप, शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख बाळाजी विचारे, कर्जत पंचायत समितीचे माजी उपसभापती मनोहर थोरवे, किरवलीचे सरपंच संतोष सांबरी, उपसरपंच बबन गायकर, माजी सरपंच अर्जुन राणे, आरपीआयचे तालुकाध्यक्ष हिरामण गायकवाड, माजी उपसरपंच बिपिन बेडकर, पंकज ओसवाल, अनिल होजगे, नितीन बेडकर, मंगेश ठोंबरे, दिलीप पाटील, महेंद्र देशमुख, उमेश परदेशी, अरुण देशमुख, नीना गुजराथी आदींसह सोसायटीतील रहिवासी उपस्थित होते. ज्ञानदीप सोसायटीचे अध्यक्ष अजित पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. राजेंद्र देशमुख यांनी प्रास्ताविक केले. यावेळी आमदार थोरवे यांनी, या भागातील रस्त्याची समस्या अनेक दिवसांपासून होती. ती मार्गी लागल्याचे मला समाधान आहे, असे स्पष्ट केले.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**TENDER EXTENSION NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following work.

| **Tender No.:** EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-9/22-23 **(RFx No. 7000026071)** | **Period for Submission of E-Bid:** 14.02.2023 to 21.02.2023 up to 23:59 Hrs |
|---|---|

**Name of Work:** Providing and Fixing of fire bucket sheds with buckets at 400kV RS, Kharghar.

| Estimated Cost (in Rs.) | EMD (in Rs.) | Tender Fee (in Rs.) | Closing Date | Technical Opening Date | Commercial Opening Date |
|---|---|---|---|---|---|
| 10,30,144.02 (Including GST) | 10,301.44 | 500/- + GST | 21.02.2023 up to 23:59 Hrs | 22.02.2023 at 10:00 Hrs (If possible) | 22.02.2023 at 10:15 Hrs (If possible) |

**Contact Persons:** (1) Mr. S.J. Darekar, Executive Engineer-Charge, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040 (2) Ms. P.C. Deshpande, Dy. EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details, visit our website **www.mahatransco.in**

1) Tender documents can be downloaded by online only from aforesaid website.
2) Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender (New) portal: **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - आकुर्ली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| २३८/१/अ | ०-०६-३० | ०.५३ | **श्री. अनंता उर्फ आनंता चाया उर्फ चाहू भोपी**<br>**श्री. मच्छिंद्र जनार्दन भोपी**<br>**सौ. सरीता गुरुनाथ म्हात्रे**<br>**सौ. जयश्री तुळशिराम म्हसकर** |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी. पनवेल.

पनवेल
दि. १४/०२/२०२३.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१



## PUBLIC NOTICE

Applicant Adv.Shri. T. D. Dabhi

**IN THE COURT OF THE 3rd ADDITIONAL DIST. JUDGE & M.A.C.TRIBUNAL, KHEDA AT KAPADWANJ. GUJARAT.**

M.A.C.P.No.: 22/2022
EXH.: 14

Applicant : **Radhaben Virambhai Soalnki.**
Resi. Chapatia, Ta: Kapadwanj,
Dist. Kheda.

V/s.

Opponent NO.1 : **Pradeepkumar Nihal Singh.**
Address:- Shop No:53, Jay Ganesh CHS Plot No : 34, Sector : 36, Panvel, Raigarh, Maharashtra.

Pertaining to opponent No. 1, in MACP No.22 of. 2022

You, Opponent No.1 is hereby informed that, due to happening accident by **Truck No. M. H. 46. BB.** 7021, at Kapadwanj- Modasa Road, Near : Garod Naka, Dist Kheda, Gujarat, the applicant has filed MACT case for compensation of **Rs.25,00,000/-** only. The applicant has also filed applications against you, to recover the amount of damage compensation and Interim relief under section 166 of M.V.Act.

You, the Opponent No.1 is hereby ordered to remain present in person or by your Pleader before this Tribunal on **23-03-2023 at 11-30 a.m.** to give your reply. You are further informed to keep with you all the written evidence on which you rely-upon.

And you are hereby further informed that, if you will not remain present on the aforesaid date, the application will be heard and dispose off Ex-parte in your absence, which may be seriously noted.

Given under my signature and seal of this Tribunal on 3rd day of February, 2023.

Prepared by : Sd/- (M. G. Vyas) Assistant,
Prepared by : Sd/- (M. G. Parmar) Superintendent

Court Seal

By Order,
**Sd/-**
**(K.J. Panchal)**
Head Clark,
MACT Branch,
Addl. District Court,
Kheda at Kapadwanj.
Gujarat.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत कै. हशा उर्फ हासू काथोड काटे उर्फ काठे व कै. रामुबाई हासू काठे मयत तर्फे वारस, १) श्री. शनिवार हासू काठे, २) श्रीमती. गणुबाई बाळाराम फडके, ३) श्रीमती. सीताबाई महादू तांबडे, ४) कै. हरिश्चंद्र हशा उर्फ हासू काटे उर्फ काठे मयत तर्फे वारस, i) श्री. रुपेश हरिश्चंद्र काटे उर्फ काठे, ii) श्री. हनुमंत हरिश्चंद्र काटे उर्फ काठे, iii) श्री. पंकज हरिश्चंद्र काटे उर्फ काठे, iv) श्रीमती. हिराबाई रमेश गायकर, v) श्रीमती. शेवंता हरिश्चंद्र काटे उर्फ काठे, vi) श्रीमती सरिता माया पावशे, vii) श्रीमती. अनिता सचिन पाटील, ५) कै. काना हशा उर्फ हासू काटे उर्फ काठे मयत तर्फे वारस, i) श्री. दत्ता काना काटे उर्फ काठे, ii) श्री. आनन काना काटे उर्फ काठे iii) श्री. सुभाष काना काटे उर्फ काठे, iv) श्रीमती. सीताबाई काना काटे उर्फ काठे ६) कै. पांडुरंग हशा उर्फ हासू काटे उर्फ काठे) श्रीमती. राघुबाई उर्फ राधुबाई पांडुरंग काटे उर्फ काठे, ii) श्रीमती. सरिता गणेश कदम, iii) श्री. अशोक पांडुरंग काटे उर्फ काठे, iv) श्रीमती. संगीता उमेश जाधव, v) श्रीमती. मोनिका गोरख पवार, vi) श्रीमती. निकिता नंदू पावशे, ७) कै. चांगुबाई गोकुळ गोंधळी मयत तर्फे वारस i) श्रीमती. राघुबाई जनार्दन तांबडे, ८) कै. नागुबाई धर्मा म्हात्रे मयत तर्फे वारस, i) श्री. पांडुरंग धर्मा म्हात्रे, ii) श्रीमती. पदूबाई नारायण काठे, iii) श्रीमती. ठकुबाई भरत भाग्यवंत, यांच्या नावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नितळस ता. पनवेल, जिल्हा रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ८९ | १ | ०-४४-३० पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-४४-३० पैकी ०-२२-०० इतके क्षेत्र | ४.६९ |

तरी सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०२/२०२३

**सही /-**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले,**

२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड पिन कोड - ४००७०२. मोबाईल नं. ७४०००९७२८६



वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर



## URAN EDUCATION SOCIETY, URAN.

**Phone No. 022-27222230, 9167962230 E-mail: uesschool@yahoo.com Website: www.uesuran.com**

Uran Education Society is a very reputed educational institute in Uran, Navi Mumbai and having school (Affiliated to State Board) & Junior & Senior College. **There are vacancies for the following posts for the ACADEMIC YEAR 2023-24.**

**CO-ORDINATOR**

**Qualification :** Candidate should be well-qualified for the post with minimum 3 years of experience.

**ACCOUNTANT**

**Qualification :** Candidate should be M.Com. and well versed in TALLY with minimum 3 yrs of experience in handling accounts independently.

**HARDWARE & SOFTWARE ENGINEER**

**Qualification :** Candidate should be Computer Science/ M.Sc. (IT)/ Diploma in IT and should be well versed in maintaining Hardware and Software and should have minimum 3 years experience.

**Teachers / Assistant Teachers :**

| | |
|---|---|
| **Jr. College** | Subjects: Maths, Chemistry, Physics, Biology, Information Technology, English, Hindi, Accounts, OCM, SP, EVS, PT, Lab Assistants-(Physics, Biology, Chemistry & IT). |
| **Secondary Section** | Subjects: Maths, English, Science, Marathi, Hindi, Social Studies, IT, Music, PT, Science Lab Assistant |
| **Primary Section** | All subjects. |
| **Pre-Primary Section** | Nursery, Jr. & Sr.KG. |
| **Non-Teaching** | Librarian (M.Lib.) |

**Qualification : Jr. College For Teachers / Asst.Teachers -**
Postgraduate with B. Ed / M.Ed. with minimum teaching experience of 3yrs.in Higher Secondary level / Junior College.

**For IT : MCA / MCM / B.Ed.**

**For Lab Assistants :** Graduate with minimum 3 yrs. experience.

**Secondary : For Teachers / Asst. Teachers:**
Graduate/Postgraduate with B.Ed. & minimum 3 years teaching experience at Secondary level.

**For IT : B.Sc.IT.**

**For Lab Assistants :** Graduate with minimum 3 yrs.experience.

**Primary :** Graduate with D.Ed. / B.Ed.

**Pre-Primary :** Graduate with Diploma in K.G. / Montessori Training / NTT / ECCED from recognized institute.

**Librarian :** M. Librarian.

Salary will commensurate with the qualification and experience. Perquisites include Provident Fund and Gratuity.

**Apply within 15 days to: The President,**
Uran Education Society's English Medium School & Jr. College of Science & Commerce, Palak Maidan, Bori, Tal.- Uran, Navi Mumbai - 400702.
Email Id: uesschool@yahoo.com



### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ७७/२०२२-२०२३ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | जुनी पाताळगंगा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती.. जुनी पाताळगंगा वॉटर वर्क्स येथील उर्ध्व अशुद्ध जलवाहिनीस पॉली आयरनाइट सिरेमिक सिमेंटिशिअस ट्रीटमेंट वापरून बाह्य संरक्षक कोटिंग करणे. (तिसरी मागणी) | ₹ ३८,८५,६४०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १५/०२/२०२३ ते दिनांक २१/०२/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांकरीता दिनांक १६/०२/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १७/०२/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ७९/२०२२-२०२३ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. विळे भागाड येथील जलशुद्धीकरण केंद्रात लिक्विड पीएसी डोसिंग प्रणालीचा पुरवठा करून स्थापित करणे आणि कार्यान्वित करणे व तुरटीच्या टाकीला कोटिंग करणे. | ₹ १८,३७,०००.०० |
| २ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. रानसई येथील जलशुद्धीकरण केंद्रातील ७५० केव्हिए डीजी सेटची रेडिएटर असेंबली बदलणे. | ₹ ५,६८,८५९.०० |
| ३ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरूस्ती.. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्र इमारतीची व अधिकारी निवासी इमारतीची दुरुस्ती आणि मजबुतीकरण हाय स्ट्रेंथ रिपेअर मोर्टार, पल्ट्रेड ग्लास फायबर वापरून करणे तसेच स्पर्शिक सामग्रीद्वारे गळती रोखणे. | ₹ ४०,१८,३०६.०० |


उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १५/०२/२०२३ ते दिनांक ०१/०३/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांकरीता दिनांक २०/०२/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २३/०२/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक

### गजानन महाराज प्रकट दिन उत्साहात

**नवी मुंबई :** येथील श्री गजानन महाराज भक्त मंडळ, वाशीच्या वतीने श्री गजानन महाराजांचा १४५ वा प्रकट दिन सोहळा उत्साहात साजरा केला. मंदिराला फुलांची



सजावट केली होती. या वेळी दुपारी १२ वाजता श्री गजानन महाराज यांचा येणाऱ्या भक्तापैकी एका भक्तांकडून ८९ व अध्याय वाचन करून घेतला व त्यानंतर आरती करण्यात आली. आरती झाल्यानंतर श्रींची मूर्तीवर फुलांचा वर्षाव करण्यात आल्यानंतर भक्तासाठी अन्नदान (महाप्रसाद) ठेवण्यात आला होता. शिस्तबद्ध पद्धतीने भक्तांनी रांगेत उभा राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. मंडळाचे अध्यक्ष किशोर बडगे,उपाध्यक्ष सुरेंद्र दाभाडे, विजय पवार, सचिव शिवाजीराव शिंदे, खजिनदार कृष्णराव वानखडे यांच्यासह मोठ्या प्रमाणात भक्तगण मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### पत्रकार घन:श्याम कडू यांना पुरस्कार



**उरण :** तालुक्यातील पत्रकार व उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम कडू यांना रविवारी (दि. १२) दैनिक रायगड टाइम्स, रत्नागिरी टाइम्स व गोवा टाइम्स यांच्या रौप्य महोत्सव दिनाचे औचित्य साधत संपादक उल्हास पवार यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याबद्दल घन:श्याम कडू यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. कडू हे गेली अनेक वर्षे पत्रकारिता क्षेत्रात कार्य करीत आहेत. त्यांनी आपली लेखणी चालविताना कोणाचीही भीडभाड न ठेवता सडेतोड चालविली आहे. या लेखणीमुळेच त्यांना या पुरस्काराने सन्मान सन्मानित करण्यात आले. सर्वच क्षेत्रातून त्यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### राकेश खराडे यांना सेवा पुरस्कार

**मोहोपाडा :** कला व सांस्कृतिक संचालनालय गोवा सरकार तसेच कला, पर्यटन व सांस्कृतिक समिती



सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मालवण येथील नाना वरेरकर नाट्यगृहातील कला संमेलनात रसायनी येथील पत्रकार राकेश खराडे यांना अभिनेते अनिल गवस, गोव्याचे कला व सांस्कृतिक मंत्री गोविंद गावडे यांच्या हस्ते पत्रकारिता सेवा सन्मान -२०२३ देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी गोवा सरकार कला व सांस्कृतिक संचालनालयाचे संचालक सगुण वेळीप, सिंधुदुर्ग कला, पर्यटन व सांस्कृतिक महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. बी. एन. खरात उपस्थित होते. पत्रकार राकेश खराडे यांना याअगोदरही पत्रकारिता व सामाजिक कार्याबद्दल विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

# नवी मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होणार

## ऐरोली-काटईदरम्यान साकारतेय चढ-उतार मार्गिका; आमदार गणेश नाईक यांचा पाहणी दौरा

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली-काटई मार्ग खुला होणार आहे. हा मार्ग खुला झाल्यानंतर ऐरोली येथील जड वाहनांची वाहतूक कमी होईल. मुंबईवरून ही वाहने थेट कल्याणकडे या उन्नत मार्गावरून पुढे जातील त्याचप्रमाणे कल्याणकडून येणारी वाहने थेट मुंबईत पुढे मार्गस्थ होतील. महापे आणि शिळफाटा येथील वाहतूक कोंडीदेखील कमी होईल तसेच या ठिकाणी होणारे अपघात टळतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ऐरोली-काटई प्रकल्पाला गती मिळाली असल्याचे आमदार गणेश नाईक यांनी नमूद केले आहे.

नवी मुंबई ते कल्याण-डोंबिवली आणि आसपासच्या शहरांतील प्रवाशांचा प्रवास वेगवान करणाऱ्या ऐरोली-काटई मार्गावर नवी मुंबईकरांसाठी चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी मार्गिका बांधण्यासाठी लोकनेते आमदार गणेश नाईक यांचा पाठपुरावा सुरू होता. त्यांच्या या मागणीला मूर्त स्वरूप प्राप्त झाले असून या मार्गावर काटईकडे जाताना चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी मार्गिका तयार झाल्या आहेत. मुंबईकडे जाताना चढण्यासाठी मार्गिकेचा कार्यादेश पुढील दहा दिवसात निघणार असून उतरण्यासाठीच्या मार्गीकेबद्दल लोकनेते आमदार नाईक एमएमआरडीएचे आयुक्त श्रीनिवासन यांच्यासोबत चर्चा करणार आहेत.



ऐरोली-काटई मार्गाच्या कामाचा पाहणी दौरा लोकनेते गणेश नाईक यांनी केला. याप्रसंगी त्यांच्यासमवेत ऐरोलीचे माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती अनंत सुतार, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी सभापती नेत्रा शीके, माजी सभापती डॉ. जयाजी नाथ, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, महापालिका आणि एमएमआर डीएचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आमदार नाईक यांनी या मार्गावर नवी मुंबईकरांना मार्गीकांसाठी एमएमआरडीएच्या आयुक्तांना वेळोवेळी पत्र दिली होती. राज्य विधिमंडळाच्या डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या अधिवेशनामध्ये हा विषय उपस्थित केला होता. महापालिकेच्या आयुक्तांना हा विषय एमएमआरडीए प्रशासनाकडे मांडण्यास सूचित केले होते. या अविरत पाठपुराव्याला अखेर यश आले असून नवी मुंबईकरांना या मार्गाचा वापर करता येणार आहे.

**संदीप नाईक यांचाही पाठपुरावा**

ऐरोली-काटई मार्गाचा उपयोग नवी मुंबईकरांसाठी व्हायला हवा यासाठी ऐरोली विधानसभा क्षेत्राचे प्रथम आमदार संदीप नाईक यांनी काटई आणि मुंबईच्या दिशेने चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी मार्गिका ठेवण्याची मागणी सर्वप्रथम एमएमआरडीएकडे केली होती. लोकनेते आमदार नाईक यांनी त्या अनुषंगाने पाठपुरावा सुरू ठेवला होता. या मार्गाचा नवी मुंबईकरांना लाभ झालाच पाहिजे अशी आग्रही भूमिका घेतली होती.

**डिसेंबरमध्ये खुला होणार मार्ग**

डिसेंबर २०२३ मध्ये बारा किलोमीटर लांबीचा ऐरोली-काटई मार्ग वाहतुकीसाठी खुला होणारा असून त्यामुळे महापे शिळफाटा मार्गे कल्याण त्यापुढे बदलापूर, मुरबाड ,अंबरनाथ याकडे जाण्यासाठी लागणारा एक तास प्रवासाचा वेळ १५ ते २० मिनिटांवर येणार आहे.

**नॉइज बॅरियर बसविण्याची मागणी**

ऐरोली-काटई मार्ग ऐरोलीमधील रहिवासी क्षेत्रातून जातो आहे. थ्री एक्सल सारखे मोठमोठे ट्रक या मार्गावरून जाणार आहेत त्यामुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनी प्रदूषण होणार आहे. या ध्वनी प्रदूषणापासून रहिवाशांना त्रास होऊ नये याकरता नॉइज बॅरियर बसविण्याची मागणी आमदार गणेश नाईक यांनी केली आहे.

**बाधितांना नुकसानभरपाई द्या**


ऐरोली-काटई मार्गामुळे ज्या सोसायट्यांना अडचण अथवा गैरसोय निर्माण झाली आहे किंवा त्या बाधित झाल्या आहेत त्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणीदेखील आमदार गणेश नाईक यांनी एमएमआरडीए प्रशासनाकडे केली आहे.

## वाशी से. २६मध्ये प्रदूषण; संकेत डोके यांनी वेधले लक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील सेक्टर २६ परिसर प्रदुषणाच्या विळख्यात आहे. या परिसरातील प्रदुषणाची हवेची गुणवत्ता ३०० ए.क्यु. आय.वर जाऊन पोहचली आहे. परिस्थिती अशीच राहिल्यास ४००चा टप्पा पार होऊन नवा विक्रम स्थापित होईल.

या परिसरातील प्रदुषणाला हा परिसर महापे एम.आय. डी.सी.पासून जवळ असणेही कारणीभूत आहे. याबाबत भाजप जिल्हा उपाध्यक्ष संकेत डोके यांनी वेळोवेळी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ यांना पत्र लिहून तसेच बैठका घेऊन ही बाब निदर्शनास आणून



दिली. जवळच सुरू असलेले रेल्वेचे खडी साठवणुकीचे कामकाज असो वा भारतीय कंटेनर निगम ने अनधिकृतरित्या स्थापण केलेले सिमेंट प्रोसेसिंग प्लांट असो याविरोधात आक्रमकरित्या नागरीकांनी आवाज उठवून याचाही हवेची गुणवत्ता ढासळण्यात हातभार आहे याची जानिव करून दिली.

संकेत डोके यांनी याबाबत मुख्यमंत्री कार्यालयालाही तक्रार केली आहे. या परिसरातील नागरीकांना रात्रीची झोपही साधी नीट मिळत नाहीये कारण भारतीय कंटेनर निगमचा क्रेन रात्रभर डरकाळ्या फोडत फिरत असतो. यामुळे या नागरिकांना सुखाची झोपही जीव गमावल्यावर मिळणार असे चित्र दिसतेय. नागरिकांनी आंदोलनाची भूमिका स्वीकारण्याचे ठरवले असून येत्या महिनाभरात प्रदुषणाचा प्रश्न मार्गी न लागल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा प्रशासकीय यंत्रणेला दिला आहे.

## केबीपी कॉलेजमध्ये कचरा व्यवस्थापन कार्यशाळा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये घरगुती कचरा व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी स्त्रीमुक्ती संघटना मुंबई विभागाच्या विश्वस्त डॉ. वृषाली मगदूम प्रमुख पाहुण्या म्हणून तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक होत्या.

डॉ. वृषाली मगदूम यांनी घरगुती कचऱ्याचे पर्यावरणावर व मानवी आरोग्यावर होणारे दूरगामी परिणाम सोप्या पद्धतीने उपस्थितांना पटवून सांगितले तसेच मानवनिर्मित कचऱ्याचे घरच्या घरी व्यवस्थापन केले तर त्यापासून खतनिर्मिती करता येते. खताचा उपयोग फुलझाडांसाठी करता येते. अशापद्धतीने प्रत्येकाने घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन केले तर डम्पिंग ग्राऊंडवर कचऱ्याचे डोंगर दिसणार नाहीत. पर्यावरण संवर्धनासाठी केवळ नियम पुरेसे नाहीत. तर प्रत्येक कुटुंबाने सक्रीय राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले.

या वेळी नवी मुंबई कचरा केचक सखी मंडळाच्या अध्यक्षा रुक्मिणीताई यांनी कचरावेचक महिलांच्या समस्या आपल्या मनोगतातून मांडल्या. या वेळी कार्यशाळेत सहभागी झालेल्या शिक्षकांना कचरा व्यवस्थापन करण्यासाठी बकेट्स देण्यात आल्या.

कॉलेजच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी घरगुती कचरा व व्यवस्थापन या विषयी लोकांना गांभीर्य नसल्याचे मत व्यक्त केले. पर्यावरण संवर्धन हा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय झाला पाहिजे. अन्यथा सर्वांनाच मोठ्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागेल. असे त्यांनी प्रतिपादन केले.

पर्यावरण दक्षता समितीचे चेअरमन डॉ. रविप्रकाश ठोंबरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आभार डॉ. श्रुती पेठकर यांनी तर सूत्रसंचालन डॉ. प्रणिता भाले यांनी केले. कार्यक्रमाला उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## उद्यानात सोलार विद्युत व्यवस्था, म्युजिक सिस्टीम

**नवी मुंबई : बातमीदार**

बाळासाहेबांची शिवसेना प्र. क्र. ५२ सेक्टर १४ येथिल मा. नगरसेविका निर्मलाताई कचरे यांच्या विशेष प्रयत्नाने निसर्ग उद्यान येथे सोलार दिवाबत्ती पोल, म्युजिक साऊंड सिस्टीम कामांचा लोकार्पण सोहळा नवी मुंबई जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांच्या हस्ते झाला. सोलर पॅनलमुळे पालिकेचे लाखो



रुपयांचे विज बिल वाचणार आहे. तर म्युजिक सिस्टीम मुळे पहाटे उद्यानात घालण्यास येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या कानावर सुमधुर संगीत ऐकण्यास मिळणार आहे. या सुविधांचे नागरिकांनीदेखील स्वागत आहे.

सोबत सामाजिक कार्यकर्ते आनंदराव कचरे, जिल्हा संघटिका शितल कचरे, संपर्क प्रमुख रामदास पवळे सह संपर्क प्रमुख सचिन कांबळे, उपशहरप्रमुख सोनु जोशी, विभाग प्रमुख सूर्यकांत कचरे, हरीभाऊ कदम, शाखाप्रमुख सुहास पाटील, उत्तर भारतीय जिल्हा प्रमुख ललित झा, विनोद सणस, सुरज गायकवाड, मयूर चव्हाण, शांताराम पाटील स्वाती दळवी सोनाली पाटील सुशिला मिश्रा बबिता भट्टाचार्य शुभांगी जाधव रुक्मिणी चिकने शोभा कोळेकर कविता काटकर सविता विभुते घारे धनश्री पाटील सुषमा वाळके व स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा प्रभागातील नागरिक ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षामुळे बिलाची रक्कम झाली कमी

**पनवेल : वार्ताहर**

बाळासाहेबांची शिवसेना शहर प्रमुख व मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष पनवेल विधानसभा प्रमुख प्रसाद सोनावणे यांच्या प्रयत्नामुळे हॉस्पिटलमधील बिलाची रक्कम तब्बल तीन लाखांनी कमी झाली आहे.

डोंबिवली येथील पाटील कुटुंबीय कोचीन (केरळ) येथे फिरायला गेले असता तेथे त्यांच्या बसला गंभीर अपघात झाला. उपचाराकरिता अपघातग्रस्त रुग्णाला खारघर येथील हॉस्पिटलला शस्त्रक्रियेसाठी आणले. शस्त्रक्रिया झाल्यावर हॉस्पिटलचे बील १२ लाख १८ हजार रुपये झाल्याचे समलले, मात्र बिलाची संपूर्ण रक्कम भरण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्याने पाटील कुटुंबीयांनी ही बाब पनवेलमधील रमेश गुडेकर यांना कळवली. त्यांनी ही बाब मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष पनवेल विधानसभा प्रमुख प्रसाद सोनावणे यांना कळवली. त्यांनी लगेच खारघर उपशहर प्रमुख शैलेश शिंदे व प्रभाग १९ चे शाखाप्रमुख अविनाश साफल्य यांना सोबत घेऊन हॉस्पिटल डॉक्टर व व्यवस्थापनाशी चर्चा करून बिलाची रक्कम १२ लाखावरून नऊ लाख रुपये एवढी कमी करून घेतली. याबद्दल पाटील कुटुंबीयांनी आभार मानले.

## उरण परिसरात वालाच्या शेंगांचे पीक बहरले

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर परिसरात येणाऱ्या ग्रामीण भागातील कळंबुसरे, कोप्रोली, नागाव, केगाव, साई, दिघाटी, केळवणे, खारपाडा या परिसरातील गावात हे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते.

वाल व चवळीच्या शेंगांचा फायदा किमान ७० ते ८० हजार रुपयांच्यावर मिळतो, परंतु चिरनेर परिसरात जंगली वानरे व उनाड गुरे यांनी येथील शेतकऱ्यांना हैराण केले आहे. त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी वाल चवळीची पिकती शेती असूनदेखील, शेती ओसाड ठेवली आहे. यात जे काही शेतकरी वाल चवळीची शेती पिकवित आहेत. त्यांना या पिकांचे संरक्षण करण्यासाठी रात्रंदिवस शेतावरच मुक्काम ठोकावा लागत आहे. तेव्हा कुठे हे पीक आमच्या हाती लागत आहे, असे येथील शेतकरी कृष्णा म्हात्रे, कल्पेश म्हात्रे,



**वन्य प्राण्यांमुळे होतेय नुकसान**

या पिकासाठी जास्त मेहनत नाही, परंतु या पिकाचा सुगंध वन्य प्राण्यांना आकर्षित करत असतो. वालाची झुडपे हे जंगली वानरे आणि रानटी डुकरे तसेच गुरे यांचे आवडते खाद्य असल्यामुळे या प्राण्यांना त्या पिकांपासून वंचित करण्यासाठी येथील शेतकऱ्यांना खूप मेहनत घेऊन, शेताची राखण करावी लागते.

समीर म्हात्रे, हरिश्चंद्र गोंधळी यांनी सांगितले.

कृषी मित्र प्रफुल्ल खारपाटील यांनी सांगितले की, सर्व शेतकऱ्यांनी भात पीक घेतल्यानंतर आपली शेती ओसाड न ठेवता वाल, चवळी, हरभरा, मुग तसेच अन्य कडधान्यांचे पीक घेतले पाहिजे. यात खूप मोठा फायदा आहे, मात्र या पिकांवर जंगली वानरांची व जंगली उनाड गुरांची वक्रदृष्टी असल्यामुळे येथील शेतकरी दरवर्षी लाखो रुपयांच्या उत्पादनाला मुकत असल्याचेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

सध्या पोपटी करण्याचा हंगाम सुरू झाला असून लोक गावठी हिरव्यागार वालाच्या शेंगांची खरेदी करण्यासाठी चिरनेर परिसरातील गावा गावात येत आहेत. सध्या वालाच्या व चवळीच्या गावठी शेंगांना प्रचंड प्रमाणावर मागणी असून येथे चवळीच्या शेंगांचा एका किलोचा दर शंभर रुपये तर वालाच्या शेंगांचा एका किलोचा दर दीडशे रुपये असा आहे. तरीही खरेदी करण्यास येणारे बाहेरचे ग्राहक आनंदाने या शेंगांची खरेदी करत असून गावठी वालाच्या शेंगांची विशिष्ट प्रकारची चव चाखत आहेत.

## अंतरिक्ष महोत्सवात स्वमग्न विद्यार्थ्यांचा जलवा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एरवी ऑटीझममुळे (स्वमग्नता) किंवा अध्ययनविषयक अक्षमतेमुळे शाळेत किंवा समाजातही पुरेशा आत्मविश्वासाअभावी चाचरत वावरणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून नेरूळ येथील आगरी कोळी सांस्कृतिक भवन अक्षरशः दणाणून सोडले.

ऑटीझम आणि शैक्षणिक अक्षमता यामुळे लहान मुले आणि शालेय विद्यार्थी तसंच त्यांचे पालक यांना भेडसावणाऱ्या विविध मानसिक, सामाजिक, शैक्षणिक आणि वैद्यकीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संपूर्ण मार्गदर्शन, उपचार करणाऱ्या चाईल्ड रिक्ट फाऊंडेशन या संस्थेच्या १३व्या वर्धापन दिनानिमित्त 'अंतरीक्ष' या आगळ्यावेगळ्या




महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

चाईल्ड रिक्ट फाऊंडेशनचे संस्थापक आणि ओक्युपेशनल थेरपिस्ट डॉ. सुमित शिंदे यांनी सांगितले की, ज्या विद्यार्थ्यांना बौद्धिक विकासाच्या समस्या असतात किंवा ज्यांना शाळेत शिकवला जाणारा अभ्यासक्रम इतर सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या वेगाने आत्मसात करता येत नाही, अशा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खालावलेला असतो. स्वमग्न विद्यार्थ्यांना समाजात संवाद साधायला अडचणी येतात. यामुळे त्यांच्या पालकांचीही चिडचिड होत असते. कोणत्या ना कोणत्या निमित्ताने अशा विद्यार्थ्यांना समाजाशी जोडून घेण्याचा सकारात्मक प्रयत्न करत राहणे आवश्यक असते. 'अंतरीक्ष'मध्ये स्वमग्न विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्या कलागुणांना मोकळा वाव देण्यामागे हाच विचार आहे.

मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पनवेल या परिसरातील २००हून अधिक स्वमग्न विद्यार्थी तसंच त्यांच्या पालकांनी अंतरीक्ष महोत्सवात सहभाग घेतला आणि विविध कार्यक्रम सादर केले. एका विशिष्ट अक्षमतेमुळे प्रतिकूलतेशी सामना करावा लागणाऱ्या या विद्यार्थी, पालकांचे मनोबल उंचावण्यासाठी रोटरी क्लबचे सदस्य, प्रतिष्ठित नागरिक तसंच शिक्षक आवर्जून उपस्थित होते.

या वेळी चाईल्ड रिक्ट फाऊंडेशनच्या वतीने या कार्यक्रमात ओक्यूपेशनल थेरपिस्ट आणि फिजिओ थेरपिस्ट अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला.

## निवडक



### गजानन महाराज प्रकट दिन उत्साहात

**रोहे** : येथील ज्ञानदेव चौधरी यांच्या निवासस्थानी श्री गजानन महाराज प्रकट दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या मंगल दिनी पहाटे काकड आरती, श्रींच्या पादुकांची षडोशोपचार पूजा, विविध स्तोत्र पठण, त्याचप्रमाणे हभप. ॲड. प्राची भिडे यांचे नामस्मरण या विषयावर प्रवचन झाले. श्री गजानन विजय ग्रंथाचे अध्याय पहिला वाचन दिंडी प्रमुख जयवंत दांडेकर यांचे हरिपाठ कार्यक्रम झाला. दुपारी पालखी सोहळा झाला. त्यानंतर हभप जागृती खेरटकर जाधव यांचे संतचरित्र आणि महिमा यावर प्रवचन, हेमंत ओक अभंग सेवामंडळ यांचे भजन, आरतीचा कार्यक्रम झाला. प्रकट दिनानिमित्त सात दिवस विजय ग्रंथवाचन स्मिता करंबे, पांगळे, पाटकर, जोशी व भारंबे यांच्यासह अन्य भगिनींनी केले.

### संत रोहिदास जयंतीनिमित्त कार्यक्रम



**धाटाव** : रोहा तालुका चर्मकार समाजाच्या वतीने रोहा येथे संत रोहिदास जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी चर्मकार समाजाचे जिल्हा सरचिटणीस राकेश केळकर, रोहा तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष राजेंद्र जाधव, जिल्हा उपाध्यक्ष दिपक आंबडकर, दिलीप पाबरेकर, रोहा तालुकाध्यक्ष समीर नागोठकर आदी उपस्थित होते. प्रमुख वक्ते राकेश केळकर, राजेंद्र जाधव यांनी संताचे विचार मांडले. रोहा तालुका सरचिटणीस गणेश चांदोरकर यांनी सूत्रसंचालन केले तर सहचिटणीस राजन बिरवाडकर यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच विशेष सन्मान, महिला मंडळाचे कार्यक्रम झाले.

### नेरे आदिवासी शाळेत रोटी डे साजरा



**पाली** : १४ फेब्रुवारी हा दिवस सर्वत्र व्हॅलेंटाईन्स डे म्हणून साजरा केला जातो, मात्र या दिवशी सन्मान सामाजिक विकास संस्थेतर्फे सुधागड तालुक्यात रोटी डे साजरा करण्यात आला. सन्मान सामाजिक विकास संस्थेतर्फे नानोसे येथील नेरे आदिवासी जिल्हा परिषदेच्या शाळेत हा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी मुख्याध्यापक प्रविण माडेवार, पुजा लडकर सहशिक्षका, संस्थेच्या अध्यक्षा आरती मस्करे,सचिव अमित गायकवाड, आनंद जाधव, अनुष्का जाधव, प्रशांत जाधव, सिमरन मस्करे, वैभव मस्करे व अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

### चौलमध्ये आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**रेवदंडा** : डॉ. आयेशा असीफ किरकीरे यांच्या अल-सेहा क्लिनिक चौलच्या वर्षपुर्तीनिमित्त शनिवारी (दि. ११) मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये शुगर तपासणी, रक्तदाब, ऑक्सिजन व पल्स रेट तसेच रुग्णांना मोफत वैद्यकीय सल्ला देण्यात आला. चौल परिसरातील अनेक नागरिकांनी याचा लाभ घेतला. आजच्या धकाधकीच्या जीवनात नियमित व्यायाम, योग्य आहार, पुरेशी झोप व व्यसनावर नियंत्रण ठेवल्यास आजारांवर मात करता येईल असे डॉ. आयेशा यांनी नागरिकांना सल्ला देताना सांगितले.

# विकासकामांचा वेग थांबणार नाही -आमदार दळवी

## मांडला पुलाच्या नूतनीकरण बांधकामाचे भूमिपूजन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

सत्ता कोणाचीही असली तरी आम्ही विकासकामांचा वेग थांबवणार नाही, असे आश्वासन आमदार महेंद्र दळवी यांनी दिले. मांडला पुलाच्या नूतनीकरण बांधकामाचे भूमिपूजन झाले. त्यावेळी ते बालत होते. काकळघर, मांडला ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या १५ ते २० गावांना मांडला पुलाच्या नूतनीकरणामुळे फायदा होणार आहे.



(छाया : महेंद्र खैरे)



गेल्या अनेक महिन्यांपासून मांडला पुलाची दूरवस्था झाल्याने आजूबाजूच्या ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागत होता. याबाबत निवेदनही देण्यात आले होते. त्याचा आमदार महेंद्र दळवी यांनी पाठपुरावा करून मांडला पुलासाठी नाबार्ड अंतर्गत नूतनीकरण बांधकामासाठी ९५ लाखांच्या निधीस मंजुरी मिळविली आहे. त्यानुसार आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत पुलाच्या नूतनीकरण बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले. या वेळी महिला जिल्हा अध्यक्ष ॲड. श्रद्धा ठाकूर, सुभाष महाडिक, शिंदेगट शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी, उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, जिल्हा शांतता कमिटी सदस्य निलेश घाटवळ, असगरशेठ दळवी, प्रफुल्ल मोरे, सी. एम. ठाकूर, काकळघरचे सरपंच स्वस्तिक ठाकूर, मांडलाचे सरपंच सुचिता पालवणकर, सामाजिक कार्यकर्ते सुरेश पालवणकर, माजी सरपंच शैलेश रातवडकर, विभाग प्रमुख साक्षी गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेश रातवडकर यांनी केले, तर सूत्रसंचलन धर्मेद गायकवाड यांनी केले.

आमदार महेंद्र दळवी यांचे स्वागत फटाक्याच्या आतषबाजीने व बँजोपथकाचे तालावर करण्यात आले. आमदार महेंद्र दळवी यांनी, अलिबाग ते मुरूड तालुक्यात विकासकामांचा धडाका सुरू केला आहे. महाविकास आघाडी असो अथवा नसो, येथील कार्यकर्त्यांचे मनोमिलन राहिल. केंद्रात व राज्यात कोणाची सत्ता असेल, मात्र येथील आमदार लोकांच्या मनातील असेल, असे म्हटले.

# रोह्यात वाहतूक कोंडीपासून चालक, प्रवाशांची सुटका

## पोलिसांची कामगिरी; नागरिकांत समाधान



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा-कोलाड राज्यमहामार्ग ५चे काम शहरातून होत असताना वारंवार वाहतूक कोंडी होत होती. याची दखल पोलीस निरिक्षक प्रमोद बाबर यांनी घेत वाहतूक कोंडी होणाऱ्या प्रमुख ठिकाणांवर आपली कटाक्ष नजर सदैव ठेवण्यास सुरू केली आहे. त्यामुळे जिजामाता भवन, बस स्थानक, दमखाडी नाका, नवरत्न हॉटेल या वाहतूक कोंडी होणाऱ्या प्रमुख ठिकाणावर आता वाहतूक सुरळीतपणे होत आहे.

वाहतूक कोंडीवर वर्दळीच्या वेळी पोलीस निरिक्षक जातीने लक्ष घालून त्याची माहिती सोशल मिडियाच्या माध्यमातून नागरिकांना देत असल्यामुळे नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे. रोहा शहरातून जाणाऱ्या कोलाड-रोहा-मुरूड राज्यमहामार्ग ५च्या रूंदीकरणाचे काम सुरु झाल्यापासून वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढत होते. फिरोज टॉकीज, जिजामाता भवन, बसस्थानक, नगर परिषद मुख्यालय चौक, दमखाडी, नवरत्न हॉटेल या परिसरात वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण झाले होते.

सकाळी ८ ते ११, सायंकाळी ४ ते ८ या बाजारहाट व औद्योगिक वसाहतीमधील कामगारांच्या ये-जा करण्याच्या वेळात तर या भागात वाहने वाढल्याने वारंवार वाहतूक कोंडी होत होती. त्यामुळे निरिक्षक प्रमोद बाबर यांनी वाहतूक पोलीस संदेश पोकळे, हेमंत कुथे, स्नेहा चौगुले यांना वाहतूक कोंडी होणाऱ्या प्रमुख ठिकाणी वर्दळीच्या वेळी तैनात राहण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे हे सर्व कर्मचारी आपले कर्तव्य बजावत आहेत.

# पेण पोलीस ठाण्यावर कोळी समाजाचा मूक मोर्चा

## मूर्तीचोरीप्रकरणी आमदार रविशेठ पाटीलांची पोलिसांशी चर्चा





**पेण : प्रतिनिधी**

पेण कोळीवाडा येथील आई एकविरा देवीची चांदीची मुर्ती व पादुका ८ फेब्रुवारी रोजी मंदिरातून चोरीला गेली आहे. सात दिवस उलटूनदेखील चोरट्यांचा पत्ता लागत नसल्याने मंगळवारी (दि. १४) पेण कोळी वाड्यातील बांधवांनी पोलीस ठाण्यावर मूक मोर्चा काढत आपले निवेदन दिले.

कोळीवाड्यातील आई एकविरा देविच्या मंदिराजवळून मूक मोर्चा काढण्यात आला. तो मोर्चा अंतोरा रोडमार्गे कोतवाल चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौकावरून पोलीस ठाण्यात नेण्यात आला. पंचकमिटी कोळी समाजातर्फे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, आई एकविरा देवीची चांदीची दिड फूटाची मूर्ती चोरीस गेल्याने आमच्या भावना दुखावल्या आहेत. त्यामुळे लवकरात लवकर चोराला पकडून योग्य तो शासन व्हा व आईची मूर्ती व पादुका परत मिळावी, अशी विनंती करण्यात आली आहे. या दरम्यान कोळी समाज पंच कमिटी सदस्यांनी आमदार रविशेठ पाटील यांची भेट घेऊन या चोरीच लवकरात लवकर व्हावा यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न करावेत अशी मागणी करून निवेदन देण्यात आले. या वेळी माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील उपस्थित होत्या. आमदार रविशेठ पाटील यांनी त्वरित जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून पोलीस यंत्रणेने युद्धपातळीवर तपास करावा असे सांगितले.

पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी सांगितले की, आम्ही वेगवेगळ्या तीन टीम केल्या असून शोधमोहीम सुरू आहे. आधुनिक यंत्रणेचा वापर करीत आहोत. सायबर बॅच आम्हाला मदत करीत आहेत. लवकरात लवकर चोराला पकडण्यात येईल.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विरेश्वरचा परिवार मिलन कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

समाजाच्या सर्व घटकापर्यंत जाऊन त्यांच्यासोबत राहून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आतापर्यंत कार्य करीत आला आहे. संघकार्यास नेहमी विरोध झाला, परंतु कार्यकर्त्यांनी आपला समाजसेवेचा वसा टाकला नाही. देशावर जेव्हा संकटे आली त्यावेळी संघ देशासाठी धावून आला आहे. संस्कारक्षम व्यक्तिमत्त्व घडविण्याचे काम संघाच्या एक तासाच्या शाखेत चालते, असे प्रतिपादन ज्येष्ठ कार्यकर्ते माधवराव गांगुर्डे यांनी खोपोली येथे केले.




रा. स्व. संघ विरेश्वर शाखेच्या परिवार मिलन कार्यक्रमात गांगुर्डे विचार व्यक्त करीत होते. या वेळी व्यासपिठावर प्रमुख पाहुण्या हास्य क्लबच्या अध्यक्ष जयमाला पाटील, तालुका कार्यवाह अविनाश मोरे उपस्थित होते.

प्रमुख अतिथी जयमाला पाटील यांनी, जाज्वल्य देशभक्ती म्हणजेच संघाचे कार्य असल्याचे सांगताना, जो धर्माचे रक्षण करतो त्याचे नेहमी धर्मरक्ष करीत आल्याचे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. संघाचे तालुका कार्यवाह अविनाश मोरे यांनी, संघाच्या कार्याची माहिती थोडक्यात सांगताना, जसजशी समाजाला संघाची गरज पडली त्या त्यानुसार संघाने आपल्या कामात बदल केल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरणाचे संवर्धन करण्याविषयी अतुल कोठारी यांनी पाणी वाचवा, झाडे लावा, प्लास्टिकचा वापर टाळा, हा संदेश प्रत्येकाने घरोघरी पोहोचवा असे आवाहन केले. विरेश्वर शाखेचे कार्यवाह उपेंद्र कर्मकर यांनी शाखेत चालणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित कुलकर्णी यांनी केले. सांघिक पद्य दीपक कुवळेकर यांनी सादर केले, तर वैयक्तिक पद्य ओमकार भट यांनी सादर केले.

कार्यक्रमात विविध स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या स्पर्धकांचे स्मृतिचिन्ह देऊन अभिनंदन करण्यात आले. सामाजिक कार्यात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गायकर कुटुंबाचेही सत्कार करण्यात आला. नादब्रह्मच्या कलाकारांनी संपूर्ण वंदे मातरम् गीत सादर केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# मोर्बा विभागात तीन वाहनांचा अपघात; एक जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

मोर्बा विभागातील नाईटणे गावच्या हद्दीत तीन वाहनांच्या झालेल्या अपघातात एक जण जखमी झाला. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. १३) ९.१५च्या सुमारास नाईटणे गावच्या हद्दीत इरफान सलीम हुदली (वय २७, रा. सुलेबागी, बेळगाव) हा ट्रक (केए २२ डी २१८१) बेदरकारपणे चालवून त्याने पुढे असलेल्या ट्रकला (केए २२ डी ५२४९) ओव्हरटेक केले. या नादात फिर्यादींच्या ताब्यातील टेम्पोला (एमएच ४३ वीएक्स ४९१७) समोरुन व ओव्हरटेक केलेल्या ट्रकलाही धडक देऊन अपघात केला. या अपघातात तीनही वाहनांचे नुकसान झाले असून क्लिन्नर करीअप्पा मारुती पुजारी (रा. अंकलगी, बेळगाव) हा जखमी झाला आहे.

# चाऱ्याच्या शोधात मेंढरांची भटकंती

## घाटमाथ्यावरील मेंढपाळ कोकणात दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात मेंढपाळांचे दरवर्षीप्रमाणे चाऱ्याच्या शोधात आगमन झाले आहे. दिवसेंदिवस भासणाऱ्या चाऱ्याच्या टंचाईमुळे या मेंढपाळांना भटकंती करावी लागत आहे.

पूर्वी कोकणात मोठ्या प्रमाणात चारा असायचे, मात्र गेल्या काही वर्षांत औद्योगिकरणाचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले. शिवाय जंगले नामशेष होत आहेत. त्याचबरोबर पावसाळा संपताच वणवे मोठ्या प्रमाणात लागले जात असल्यामुळे मेंढ्यावर उपासमारीचे संकट निर्माण झाले आहे. पिण्याच्या पाण्याचीही समस्या जाणवत आहे.



(छाया : विनायक माडपे)

पावसाळा संपताच घाटमाथ्यावरील असलेले मेंढपाळ आपल्याजवळ असलेल्या मेंढ्या, गायी, बैल, कुत्रे असा लवाजमा घेऊन कोकणात येतात आणि पशुधन जगविण्यासाठी भटकंती करीत असतात. आमचे जितराबाचे लोंढेच्या लोंढे आमच्याबरोबर असून शेळ्या, मेंढ्यांच्या घोळक्यात घोडे, कुत्रे, कोंबड्या असा लवाजमा त्यांच्याजवळ असतो. जागा मिळेल तिथे मुक्काम आणि सकाळी पुढे प्रवासाला जाणे असा नित्यक्रम मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत चालत असतो. पावसाळा सुरू होताच आम्ही मंडळी गावी परततो, असे घाटमाथ्यावरुन आलेल्या मेंढपाळांनी सांगितले.

# ‘निरोगी आयुष्यासाठी तृणधान्य उपयुक्त’

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शेतकरी ते ग्राहक थेट विक्री स्टॉलला भेट देऊन तृणधान्य खाण्याची शारीरिक गरज असून परंपरेनुसार चालत आलेली नाचणी, वरी, बाजरी यांचे आहारातील प्रमाण निरोगी आयुष्यासाठी उपयुक्त असते, असे प्रतिपादन कृषीचे आयुक्त सुनील चव्हाण यांनी केले. पनवेल येथील कृषी महोत्सवाची पाहणी करताना ते बोलत होते.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व आत्मा रायगड-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा कृषी महोत्सवाचे आयोजन ९ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत पनवेल येथे करण्यात आले होते. या कृषी महोत्सवांत आयुक्तांनी भेट देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी पौष्टिक तृणधान्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी तयार करण्यात आलेले क्यूआर कोडबाबत माहिती देण्यात आली. त्याचबरोबर त्यांनी सर्व स्टॉलची पाहणी करीत शेतकरी व महिला बचत गटातील सदस्यांना पॅकिंग व ब्रॅण्डिंगवर लक्ष देण्याबाबत मार्गदर्शन केले.

कृषी विभागाच्या दालनामधील जिल्ह्यातील नावीन्यपूर्ण कृषी उत्पादनाच्या नमुन्यांची त्याचप्रमाणे विभागाने केलेले जलकुंड, एसआरटी, पॉलिहाऊस मॉडेल्सची पाहणी केली. यानंतर आयुक्तांच्या हस्ते पीएमएफएमएमई स्मार्ट अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी व भातपिक स्पर्धा या योजनेतील लाभार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# स्वातंत्र्यलढ्यात महिलांचे योगदान अतुलनीय -राहुल सोलापूरकर

**खोपोली : प्रतिनिधी**

देशभरातील कानाकोपऱ्यातील महिलांनी पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊन हौतात्म पत्करले या सर्वांच्या इतिहास आजच्या पिढीला माहित होणे गरजेचे आहे, अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी खोपोली येथे व्यक्त केली.

दासनवमी उत्सवानिमित्त लोहाणा समाज सभागृहात भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रियांचे योगदान या विषयावर सोलापूरकर बोलत होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाल्यानंतर स्वामी रामदासांच्या प्रतिमेस व स्व. शैला बाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. खोपोली या छोट्या शहरात दासनवमी उत्सव गेली ३० वर्षे सुरू ठेवून बाम कुटुंबीयांनी साथ देणाऱ्या ब्राह्मण सभा संघटनेबद्दल सोलापूरकर यांनी गौरवोद्गार काढले.



सोलापूरकर यांनी, स्वातंत्र्यपूर्व काळातील असंख्य अज्ञात वीरांगनांचा इतिहास शब्दरूपी प्रेक्षकांसमोर मांडला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अमृत महोत्सवी वर्षात केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने ही माहिती गोळा करण्यास सुरुवात केली आहे व ती एमपीएससी परीक्षेसाठीसुद्धा त्यांचा समाविष्ट केल्याचे सोलापूरकर यांनी आवर्जून सांगितले. सूत्रसंचालन पाठक सर यांनी केले. ॲड. मीना बाम यांनी संपूर्ण वंदे मातरम् सादर केले, तर आभार रानडे यांनी मानले.

# करंजाडेत सरपंच, उपसरपंच चषक स्पर्धा

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन







(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील करंजाडे येथे भारतीय जनता पक्ष पुरस्कृत यु. के. ग्रुपच्या वतीने सरपंच, उपसरपंच चषक २०२३ या भव्य नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १३) झाले.

स्पर्धा १३ ते १६ फेब्रुवारीदरम्यान करंजाडे सेक्टर ६ येथील दि. बा. पाटील मैदानात खेळली जात आहे. प्रथम क्रमांक विजेत्यास एक लाख रुपये, द्वितीय विजेत्यास ५० हजार आणि तृतीय विजेत्यास २५ रुपये आणि तिन्ही विजत्यांना भव्य चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजपचे जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# तायक्वांदो स्पर्धेत खेळाडूंचे यश



**नवी मुंबई : बातमीदार**

नाशिक विभागीय क्रीडा संकुलात नुकतीच वरिष्ठ राष्ट्रीय तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत भारतातून ३७०हून अधिक स्पर्धकांनी क्योरुगी व पुमसे प्रकारात सहभाग घेतला. नवी मुंबई व रसायनीतील खेळाडूंनी पुमसेच्या विविध गटांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करीत यश मिळविले.

तुषार तानाजी सिनलकर याने ३० वर्षांखालील वैयक्तिक पुरुष गटात महाराष्ट्राला कांस्यपदक मिळवून दिले. त्यानंतर लगेचच अमोल नारायण माळीने ४० वर्षांखालील वैयक्तिक पुरुष गटात दुसरे कांस्यपदक मिळविले. तुषार सिनलकर, ओंकार गिरे व तेजस सोनवणे यांनी ३० वर्षांखालील पुमसे सांघिक पुरुष गटात कांस्यपदक, नूपुर पावगे, अनुष्का लोखंडे व संस्कृती दळवी यांनी ३० वर्षांखालील पुमसे सांघिक महिला गटात कांस्यपदक पटकाविले. याशिवाय अमोल माळीने पालघरच्या राजा मकवाना व योगेश जोशी यांच्यासोबत ३० वर्षांवरील पुमसे सांघिक पुरुष गटात आणखी एक कांस्यपदक मिळविले, तर नूपुर पावगे ३० वर्षांखालील पुमसे वैयक्तिक महिला गटात अंतिम फेरीत पाचव्या स्थानी राहिली.

महाराष्ट्र संघांच्या खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन करीत या स्पर्धेत चार सुवर्ण, सहा रौप्य आणि १३ कांस्यसह एकूण २३ पदके पटकावली. नवी मुंबईतील खेळाडूंना राष्ट्रीय खेळाडू तुषार सिनलकर यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, नवी मुंबईचे माजी महापौर जयवंत सुतार तसेच तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष अनिल झोडगे, महासचिव संदीप ओंबासे, अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशन ऑफ रायगडच्या अध्यक्ष अ‍ॅड. प्रज्ञा भगत, सचिव सचिन माळी, उपाध्यक्ष संजय भोईर, खजिनदार रोहित सिनलकर तसेच महाराष्ट्र पोलीस डायल ११२च्या अधीक्षक डॉ. प्रिती टिपरे यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# नवी मुंबईत जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेला प्रतिसाद



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ४०० स्पर्धकांनी सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

विजेत्या जलतरणपटूंना क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाचे उपायुक्त सोमनाथ पोटरे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, राष्ट्रीय प्रशिक्षक संतोष पाटील, शिवछत्रपती पुरस्कार विजेते जलतरणपटू तथा ठाणे जिल्हा जलतरण असोसिएशनचे सचिव गोकुळ कामथ, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या जलतरणपटू ऋतुजा उदेशी यांच्या हस्ते पदक व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. भोपाळ येथे झालेल्या खेलो इंडिया युथ गेम्स २०२२मध्ये फ्रि रिलेमध्ये सुवर्ण, मेडली रिलेमध्ये सुवर्ण व २०० बॅकस्ट्रोकमध्ये कांस्यपदक पटकाविणाऱ्या रिषभ दास या जलतरणपटूचा या वेळी विशेष सन्मान करण्यात आला.

जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत बॅकस्ट्रोक, बटरफ्लाय, ब्रेस्टस्ट्रोक, फ्री स्टाईल आणि इंन्डिइज्युअल मिडले या पाच प्रकारांत ही स्पर्धा शनिवार आणि रविवारी झाली. सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या जलतरणपटूला चॅम्पियनशिपचे स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. यामध्ये खुल्या गटात अथर्व जरंगे याने, १६ वर्षांखालील मुलांच्या गटात रिषभ दास, १४ वर्षांखालील मुलांच्या गटात विहान जेजुरकर, मुलींच्या गटात अहविहा गांधी, १२ वर्षांखालील मुलांच्या गटात तोशल भिरूड आणि मुलींच्या गटात अमिता कुडवा हिने चॅम्पियनशिप पटकाविली. १० वर्षांखालील मुलांच्या गटात रायन सय्यद व मुलींच्या गटात निधी सामंत, आठ वर्षांखालील मुलांच्या गटात इवान शाह व मुलींच्या गटात अलिसिया शेट्टी यांनी चॅम्पियनशिप चषक पटकाविले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा 'अंतरंग'मध्ये सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मुंबई विद्यापीठ अंतर्गत चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाने आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन (अंतरंग) क्रिकेट टूर्नामेंटमध्ये सहभाग घेतला. या संघाने प्रथम फेरीमध्ये हिंदुजा महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या टीमला हरवून यश संपादन केले.

या अंतरंग क्रिकेट टूर्नामेंटमध्ये एकनाथ म्हात्रे, सचिन पाटील, भाऊ पाटील, महिंद्रा घरत, मोहित गंबास, भाविक देशमुख, स्वप्नील पाटील, अनंत सावंत, वैभव झगडे, एकनाथ पारवे, काशिनाथ हजारी, दिलीप वाक, नितीन वासकर, दीपक पवार, जयंत भोईर व राजेश वासकर या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. सचिन पाटील यांना सामनावीर घोषित करण्यात आले.

प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे तसेच प्राध्यापकवृंदाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# बदलापूर संघ केएमए फ्रेंडशिप कपचा मानकरी

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

कर्जत मेडिकल असोसिएशनच्या वतीने केएमए फ्रेंडशिप कप २०२३ या डॉक्टरांसाठीच्या टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात बदलापूर संघाने विजय संपादन करून फ्रेंडशिप कप जिंकला. यजमान कर्जत संघ उपविजेता ठरला.

कर्जत मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. नितीन भोपतराव यांच्या नेतृत्वाखाली डॉ. प्रशांत गांगल, डॉ. निलेश म्हात्रे, रायगड मेडिकल असोसिएशनच्या डॉक्टर प्रीमियर लीगची कल्पना प्रथम २००५मध्ये प्रत्यक्षात आणणारे कर्जत मेडिकल असोसिएशनचे संस्थापक सदस्य डॉ. आशुतोष कुलकर्णी आणि कॅबिनेट सदस्य यांनी या स्पर्धेचे नेटके आयोजन केले होते. त्याचबरोबर कर्जत महिला डॉक्टरांचे बॉक्स क्रिकेट सामनेही रंगले.

अलिबाग, बदलापूर, कल्याण आणि कर्जत येथील प्रतिथयश डॉक्टरांच्या संघांनी यात सहभाग घेतला. या वेळी बोलताना अलिबाग संघाचे डॉ. राजाराम हुलवान यांनी डॉक्टरांच्या आरोग्यासाठी मैदानी खेळ खेळणे गरजेचे असल्याचे सांगितले.

स्पर्धेत मालिकावीर डॉ. कुलदीप इंगोले, उत्कृष्ट फलंदाज डॉ. आशिष यादव, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून डॉ. विनय सांगळे यांची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी बजावणारे खेळाडू यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या वेळी रत्नराज नर्सिंग होमचे डॉ. प्रेमचंद जैन, मातोश्री हॉस्पिटलचे डॉ. दिग्विजय पवार, डॉ. विलास सरोदे, डॉ. हेमंत शेवाळे, रायगड मेडिकल असोसिएशनचे इलेक्ट प्रेसिडेंट डॉ. निशिगंध आठवले, केएमए माजी अध्यक्ष डॉ. शर्वाणी कुळकर्णी आणि कर्जतमधील डॉक्टर उपस्थित होते.

# पेणच्या कराटेपटूंचे जिल्हास्तरीय स्पर्धेत सुयश

**पेण : प्रतिनिधी**

युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशनने पनवेल खांदा कॉलनी येथे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत पेणमधील खेळाडूंनी विविध पदके जिंकली.

स्पर्धेचे आयोजन युएसकेए प्रसिद्धी प्रमुख सेन्साय प्रतिक कारांडे यांनी केले होत. युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. खरात यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

स्पर्धेत रूद्रेश प्रथमेश पाटील, मंथन दिनकर पाटील, गौरव संदीपान लटपटे, मनीष चंद्रकांत पाटील, सुफियान मिनहाज अन्सारी, अबान असिफ पठाण, गैरव गोरखनाथ म्हात्रे, स्मित श्रीकांत म्हात्रे यांनी सुवर्ण; वंश राजेश स्वामी, कार्तिक राजेंद्र जाधव, अनुज बलदेवसिंग लिंगबाल यांनी रौप्य; तर दृष्टी महेश पाटील, वरद दिनेश भोईर, वरद संदीपान लटपटे यांनी कांस्यपदक जिंकले. या सर्व खेळाडूंना शिहान रवींद्र म्हात्रे व सेन्साय विनायक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

स्पर्धेसाठी निलेश भोसले, संजय पाटील, भालचंद्र भगत, योगेश पाटील तसेच दीपक काइंदे उपस्थित होते. सर्व विजयी स्पर्धेकांना पदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.






# माणगावच्या प्रिशा गोविलकरला राज्यस्तरीय बॉक्सिंगमध्ये 'कांस्य'

**माणगाव : प्रतिनिधी**

शिर्डी येथे रविवारी (दि. १२) झालेल्या राज्यस्तरीय किक बॉक्सिंग लीगमध्ये नऊ वर्षांखालील गटात माणगाव येथील प्रिशा रोहित गोविलकर हिने कांस्यपदक जिंकले.



यापूर्वी प्रिशाने जानेवारीमध्ये पनवेल येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले होते. प्रिशा ही माणगावचे त्वचारोग तज्ज्ञ डॉ. क्षितीजा गोविलकर व डॉ. रोहित गोविलकर यांची कन्या आहे. या यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या स्पर्धेसाठी तिला मंदार चवरकर व अविष्कार पाटणूसकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रिशाने या वर्षी अबॅकस या गणितविषयक परीक्षेतही कांस्यपदक मिळविले आहे.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com